संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३१-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, सोमवार दि. ०६.०७.२०२६ अंक नं. ०८२ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel.: (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

## महावितरणच्या निष्काळजीपणाने घेतला तीन वर्षीय चिमुकलीचा जीव

नगर – शहरातील स्टेशन रोड परिसरात ६ जुलै रोजी दुपारी एक हृदयद्रावक आणि संतापजनक घटना घडली. घरासमोरील विजेच्या खांबाला स्पर्श झाल्याने विजेचा तीव्र धक्का बसून प्रीती गांगुर्डे या अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकलीचा दुर्दैवी अंत झाला. महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळेच या निष्पाप बालिकेला आपला जीव गमवावा लागल्याचा आरोप करत परिसरातील नागरिकांनी तसेच नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, स्टेशन रोड परिसरातील या विजेच्या खांबातून विद्युत प्रवाह (करंट) उतरत असल्याच्या तक्रारी गेल्या अनेक दिवसांपासून महावितरणकडे सातत्याने केल्या जात होत्या. मात्र, संबंधित प्रशासनाने या गंभीर तक्रारींकडे सपशेल दुर्लक्ष केले. महावितरणच्या याच निष्काळजीपणामुळेच प्रीतीचा बळी गेला असल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी व तिच्या नातेवाईकांनी केला आहे. या घटनेची माहिती मिळताच लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नगरसेवक दत्ता गाडळकर, गीतांजली काळे यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. हा केवळ अपघात नसून महावितरणच्या बेजबाबदारपणामुळे झालेला मृत्यू आहे. वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आक्रमक मागणी नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

घटनेनंतर संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, निष्पाप प्रीतीच्या मृत्यूला कारणीभूत ठरणाऱ्यांवर कठोर कारवाई होईपर्यंत नागरिक शांत बसणार नसल्याचा इशारा स्थानिक रहिवाशांनी दिला आहे.
















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# भाजीपाला विक्रेत्या महिलेला रस्त्यात अडवून लुटले

### सोन्याच्या दागिन्यांसह ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल केला लंपास

नगर –भाजीपाल्याची विक्री करून स्कूटरवरून घराकडे परतणाऱ्या एका महिलेला रस्त्यात अडवून दोन अज्ञात इसमांनी लाथ मारून खाली पाडले आणि त्याच्याकडील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने चोरून नेल्याची धक्कादायक घटना देहरे गावात घडली आहे. याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संगीता बाळासाहेब शिंदे (रा.देहरे, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ४ जुलै रोजी नेहमीप्रमाणे भाजीपाल्याची विक्री करून रात्री आठ वाजेच्या सुमारास आपल्या स्कूटरवरून घरी परतत होत्या. त्या देहरे गावातील वडार स्मशानभूमीजवळील वनीकरण विभाग रस्त्यावरून जात असताना अचानक दोन अज्ञात इसमांनी त्यांना अडवले. त्या दोघांनी शिंदे यांच्या स्कूटरला जोरात लाथ मारून त्यांना रस्त्यावर पाडले आणि त्यांच्याकडील सोन्याचे दागिने, ओप्पो कंपनीचा ए–५ प्रो मोबाईल फोन आणि रोख रक्कम हिसकावून घेऊन पोबारा केला. या अनपेक्षित हल्लयात चोरट्यांनी एकूण ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेनंतर घाबरलेल्या शिंदे यांनी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) आणि ३(५) अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.




शहरात सुरु असलेल्या संततधार पावसामुळे सकाळी शाळेत जाताना विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागला. (छाया – लहू दळवी)

# जिल्ह्यात संततधार; धरणांमध्ये पाण्याची आवक सुरु, पुढील दोन दिवस नगरला मुसळधार पावसाचा इशारा

नगर – जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून प्रमुख धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने धरणांमध्ये पाण्याची आवक सुरू झाली आहे. भारतीय हवामान विभागाने ६ व ७ जुलै रोजी जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासनाने सतर्कतेचे आवाहन केले आहे.

गेल्या २४ तासात अकोले तालुक्यात सर्वाधिक २६.५ मिमी, पारनेर तालुक्यात २६.४ मिमी, तर श्रीगोंदा तालुक्यात २४ मिमी पावसाची नोंद झाली. इतर सर्व तालुक्यांतही संततधार पाऊस सुरू असून धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही चांगला पाऊस पडत आहे.

जिल्ह्यातील प्रमुख धरणांमध्ये अद्याप पाणीसाठा कमी असला तरी त्यामध्ये हळूहळू वाढ होत आहे. भंडारदरा धरणात सध्या ३३.५१ टक्के, निळवंडे धरणात १६.७५ टक्के, तर मुळा धरणात ८.८४ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. अन्य प्रकल्पांमध्ये टाकळीभान (३१.४१ टक्के), मुसळवाडी (३०.१६ टक्के), आढळा (२८.३१ टक्के), विसापूर (१३.०५ टक्के), सीना (१०.६६ टक्के) आणि खैरी (९.०४ टक्के) इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. मागील २४ तासात भंडारदरा परिसरात ७२ मिमी, निळवंडे परिसरात ३८ मिमी, तर मुळा धरण परिसरात ९ मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे येत्या काही दिवसांत धरणांच्या पाणीपातळीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान पुढील दोन दिवस जिल्ह्यात मुसळधार पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

अहिल्यानगर शहरात पहाटेपासून सुरू झालेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सकाळच्या कार्यालयीन आणि शालेय वेळेत पावसाचा जोर कायम राहिल्याने प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचा वेग मंदावला. अनेक सखल भागांत पाणी साचल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागला. शाळेच्या वेळेतच पाऊस सुरू असल्याने विद्यार्थ्यांचीही मोठी तारांबळ उडाली. अनेक विद्यार्थी रेनकोट आणि छत्र्यांच्या साहाय्याने शाळेत पोहोचले, तर लहान मुलांना पालकांनी स्वतः शाळेत सोडण्यासाठी धावपळ केली. काही शाळांबाहेर पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना पाण्यातून मार्ग काढावा लागला.

### भीमा नदीकाठच्या गावांना इशारा

पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली असून नदीवरील दौंड पुलाजवळून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आला आहे. ६ जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत २७ हजार ८४७ क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू होता. तसेच नांदूर मधमेश्वर धरणातून ३०० क्युसेकने गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली. स्थानिक रहिवाशांनी नदीपात्रापासून सुरक्षित अंतर ठेवावे, पूलावरून पाणी वाहत असल्यास तो ओलांडू नये तसेच पूर पाहण्यासाठी गर्दी करू नये. संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन संवेदनशील गावांमध्ये अन्नधान्य, औषधे तसेच आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. नदीकाठच्या गावांनी सतर्क रहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

### सीना नदीवरील पर्यायी रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

शहरातील कल्याण महामार्गावरील सीना नदीवरील पुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरु आहे. पावसाळ्यात पूल बंद झाल्यास नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असून पर्यायी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ॲड. युवराज शिंदे यांनी केली आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना दिलेल्या निवेदनात कल्याण महामार्ग ते वारुळाचा मारुती रस्ता जोडणाऱ्या पर्यायी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून त्यावर मुरूम टाकण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या हा रस्ता चिखलमय झाल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. मागील वर्षी पुराच्या पाण्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची आठवण करून देत, येत्या आठ दिवसांत पर्यायी रस्ता वाहतुकीयोग्य करण्यात आला नाही तर महापालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ॲड. युवराज शिंदे यांनी दिला आहे.

# जुगार व अवैध दारू अड्ड्यांवर छापेमारी

### ६ लाख ५९ हजार ५ रूपयांचा मुद्देमाल जप्त, ३३ जणांवर गुन्हे दाखल

नगर – जिल्ह्यातील जुगार व अवैध दारू व्यवसायाविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) ५ जुलै रोजी धडक कारवाई करत नेवासा, नगर तालुका, राहाता आणि लोणी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच दिवशी पाच ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत एकूण पाच गुन्हे दाखल करण्यात आले असून ३३ संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच ६ लाख ५९ हजार ५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर कारवाईचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे, विकास जाधव, कृष्णकुमार सेदवाड, महादेव गुट्टे यांच्यासह पोलीस अंमलदारांची स्वतंत्र पथके तयार करण्यात आली. या पथकांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे विविध ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून ही कारवाई केली.

नेवासा पोलीस ठाण्यात अलिम शकील शेख, सतीष नानासाहेब भागवत, जालिंदर उत्तम खरात, विठ्ठल सुरेश पवार, राहुल मिनीनाथ कवडे, प्रशांत कैलास गायके, प्रकाश बाळासाहेब जाधव, आकाश रावसाहेब पारखे, गणेश दत्तात्रय पवार व राहुल मिनीनाथ कवडे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध दारू विक्री व जुगार अड्ड्यावर केलेल्या छापेमारीप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. दारूविक्री प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात सुरज नारद पंडित व सोमनाथ सुनील जगदाळे यांच्याविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राहाता पोलीस ठाणे हद्दीत जुगारावर केलेल्या कारवाईप्रकरणी अशोक तुकाराम सोनवणे, अंज्याबापु किसन त्रिभुवन, संजय शिवराम जेजुरकर, निसार कादरभाई शेख, भागवत किसन त्रिभुवन, उस्मान ईब्राहिम पठाण, लक्ष्मण गोविंद गायकवाड, अरूण साहेबराव वर्पे, मुन्नावर इब्राहिम शेख, राजेंद्र किसन पोटे, गोकुळ सोन्याबापु गाडेकर, सोपान बबन लहामगे व संजय कचरू राऊत यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, लोणी पोलीस ठाणे हद्दीत जुगारावर केलेल्या कारवाईप्रकरणी नईम सलीम सय्यद, कासाम मकबुल शेख, दगडु सखाराम बोरूडे, इरफान अहमद शेख, अमजद रशिद शेख, नवाज महंमद शेख, अनिस सांडू पठाण, जुल्फकार शकील शेख, मोहनराज नारायण बोरूडे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आनंदनगर येथील तीन वर्षीय मुलीच्या मृत्यूप्रकरणी महावितरणच्या अधिकारी आणि ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा, या मागणीचे निवेदन देताना शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम, दत्ता कावरे, नितीन भुतारे, परेश लोखंडे, काका शेळके, संतोष मेहेर आदी.

# बालिकेच्या मृत्यूनंतर महावितरणविरोधात राष्ट्रवादी कॉँग्रेसचे ठिय्या आंदोलन

### दोषी अधिकारी व ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी; जॉईंट एमडी, मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंत्यांसमोर संताप व्यक्त

नगर – शहरातील स्टेशन रोडवरील आनंदनगर परिसरात राहणाऱ्या अवघ्या साडेतीन वर्षांच्या प्रीती गांगर्डे या निष्पाप चिमुरडीचा विजेच्या खांबाला शॉक लागून जागीच मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेनंतर महावितरणच्या कथित निष्काळजीपणाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने महावितरण कार्यालयाचे अधीक्षक अभियंता यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात आले. संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक महेश तवले, बाळासाहेब पवार, तसेच प्रकाश भागानगरे, मयूर बांगरे, दत्ता गाडळकर, अजिंक्य बोरकर, संभाजी पवार, सागर गुंजाळ, अभिजीत काळे, जॉय लोखंडे, रवी दंडी, दीपक खेडकर, ऋषिकेश ताठे, सुमित लोंढे, सुरज कोतकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी महावितरणचे जॉईंट एमडी दिलीप जगदाळे, महावितरणच्या नाशिक झोनचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे तसेच अहिल्यानगर महावितरण कार्यालयाचे अधीक्षक अभियंता विजयकुमार पवार उपस्थित होते.

आंदोलनादरम्यान शिष्टमंडळाने संबंधित अधिकाऱ्यांसमोर तीव्र संताप व्यक्त करत या प्रकरणातील दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच शहरातील धोकादायक अवस्थेतील वीज खांब, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा आणि प्रलंबित तक्रारींची तातडीने दखल घेऊन सर्वत्र सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणीही करण्यात आली.यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, या निष्पाप चिमुरडीचा मृत्यू हा महावितरणच्या कथित हलगर्जीपणाचा परिणाम आहे. संबंधित कुटुंबीयांनी वारंवार महावितरण कार्यालयाकडे तक्रारी करूनही कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आली नाही. वेळेत दखल घेतली असती, तर आज ही दुर्दैवी घटना घडली नसती. या प्रकरणातील दोषी अधिकारी व संबंधित ठेकेदारांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई झालीच पाहिजे.ते पुढे म्हणाले, ही मुलगी आमच्या कुटुंबातीलच असल्याप्रमाणे आम्ही तिच्या न्यायासाठी शेवटपर्यंत लढणार आहोत. महावितरण कार्यालय नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत आहे. अनेक ठिकाणी विद्युत खांब व तारा धोकादायक अवस्थेत आहेत. नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचे प्रकार तातडीने थांबवले पाहिजेत.भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते म्हणाले की, महावितरण कार्यालयाचे कामकाज आता ठेकेदारांच्या भरोशावर चालत असल्याचे चित्र आहे. संबंधित कुटुंबीयांनी वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. त्याच निष्काळजीपणामुळे एका निष्पाप बालिकेचा जीव गेला. जोपर्यंत पीडित कुटुंबाला न्याय मिळत नाही आणि दोषींवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.



आनंदनगर येथील तीन वर्षीय मुलीच्या मृत्यूप्रकरणी महावितरणच्या अधिकारी आणि ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी महावितरण कार्यालयात आंदोलन करताना राष्ट्रवादी कॉँग्रेसचे पदाधिकारी. (छाया – लहू दळवी)

### घटनेपूर्वीच दिली होती धोक्याची लेखी सूचना

आनंदनगर परिसरातील नागरिकांनी २१ ऑगस्ट २०२५ रोजी महावितरण कार्यालयाकडे संबंधित विजेच्या खांबाबाबत लेखी तक्रार केली होती. या निवेदनामध्ये संबंधित इलेक्ट्रिक पोल अत्यंत धोकादायक अवस्थेत असून तातडीने नवीन पोल बसविण्यात यावा, अन्यथा कधीही दुर्दैवी घटना घडू शकते, अशी स्पष्ट पूर्वसूचना देण्यात आली होती. मात्र, या निवेदनाची दखल न घेतल्यामुळेच एका निष्पाप बालिकेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकारी व संबंधित ठेकेदारांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शहरातील धोकादायक विद्युत यंत्रणेची तातडीने तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने यावेळी केली.



नगर तालुक्यातील गावठी दारू अड्ड्यांवर कारवाई करताना पोलीस.

# गावठी दारू अड्ड्यांवर नगर तालुका पोलिसांनी केली धडक कारवाई

### तीन ठिकाणीचे अड्डे उद्ध्वस्त; ७२ हजार ५०० रुपयांचे कच्चे रसायन नष्ट

नगर – नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती विरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत तीन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत ७२ हजार ५०० रुपये किमतीचे कच्चे रसायन नष्ट करण्यात आले. या प्रकरणी तीन जणांवर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत खंडाळा व खडकी गावच्या शिवारात गावठी दारू अड्डे सुरु असल्याची माहिती तालुका पोलीसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी खंडाळा व खडकी येथील गावठी दारू अड्ड्यावर धडक कारवाई करत गावठी दारू अड्डे उध्दवस्त केले. गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे सुमारे ७२ हजार ५०० रुपये किंमतीचे १४५० लिटर कच्चे रसायन नष्ट करण्यात आले.

या प्रकरणी खंडाळा (ता. नगर) येथील युवराज बजरंग गिऱ्हे व पोपट गिरधारी गिऱ्हे, तसेच खडकी येथील एका महिलेविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. छापेमारीदरम्यान दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवलेले कच्चे रसायन जप्त करून ते जागीच नष्ट करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने आणि नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार दत्तात्रय हिंगडे, पोलीस हावलदार नितीन शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल विक्रांत भालसिंग यांच्या पथकाने केली.

# मधुकर खोमणे यांचे अल्प आजाराने निधन

नगर –केकती येथील प्रगतशील शेतकरी तसेच प्रियदर्शनी पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब खोमणे यांचे वडील आणि जुन्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते मधुकर सोनाजी खोमणे यांचे अल्पशः आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केकती अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात १ मुलगा प्रियदर्शनी पब्लिक स्कुलचे संस्थापक बाळासाहेब खोमणे (सर), मुलगी सुनिता पांडुरंग साठे तसेच पत्नी व सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. केकती व परिसरात ते नाना या नावाने सुपरिचित होते. प्रियदर्शनी स्कूलच्या आजपर्यंतच्या यशामध्ये त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. त्यामुळे त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गोशाळा चालकाकडून कोर्टाच्या आदेशाशिवाय पैसे घेऊन म्हशींची लावली परस्पर विल्हेवाट

### गोरक्षकासह ५ जणांवर गुन्हा दाखल

नगर– न्यायालयाचा कोणताही आदेश नसताना आणि पोलिसांना अंधारात ठेवून, चारा–पाण्यासाठी ताब्यात दिलेल्या १२ म्हशींची २० हजार रुपयांची लाच घेऊन परस्पर सुटका केल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगर तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलिसांनी वाळकी येथील लक्ष्मीमाता गोशाळेचे चालक चांगदेव गोरख भालसिंग यांच्यासह पाच जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या तत्परतेमुळे या म्हशींची बेकायदेशीर वाहतूक करणारे दोन पिकअप टेम्पो आणि ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील कराड येथून नितेश बबन वैरागर आणि त्याच्या भागीदाराने १२ म्हशी ४०७ टेम्पोमधून नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे चालवल्या होत्या. मात्र, पुणे जिल्ह्यातील दौंड पोलिसांनी या म्हशींची अत्यंत निर्दयीपणे, दाटीवाटीने आणि चारा–पाण्याची सोय न करता वाहतूक होत असल्याचे पकडले होते. याप्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर, न्यायालयाने कोणताही निर्णय देईपर्यंत या १२ म्हशींचा सांभाळ करण्यासाठी त्या अहिल्यानगरमधील वाळकी येथील चांगदेव भालसिंग यांच्या 'लक्ष्मीमाता गोशाळेत' विश्वासाने जमा केल्या होत्या.

तक्रारदार पोलीस कॉन्स्टेबल विजय दशरथ साठे हे डायल ११२ वर कर्तव्य बजावत असताना, ५ जुलै २०२६ रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास त्यांना वाळकी शिवारातून गोशाळेतील म्हशी दोन पिकअप वाहनांमध्ये भरून नेल्या जात असल्याचा कॉल आला. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ वाळकी रोडवरील जळवाडी शिवारात दोन संशयास्पद बोलेरो पिकअप गाड्या (क्र. एमएच १६ सीसी ७६२८)आणि (एमएच १६ सीसी ८१०७) अडवल्या. या गाड्यांची पाहणी केली असता, त्यात एकूण १२ म्हशी व वगारी अत्यंत निर्दयीपणे, हालचाल करता येणार नाही अशा पद्धतीने बांधून ठेवलेल्या आढळून आल्या.

पोलिसांनी वाहनचालक अमोल दशरथ कासार, शरद गुलाब साठे आणि त्यांच्यासोबत असलेल्या शरद जगन्नाथ आल्हाट यांच्याकडे कसून चौकशी केली. या चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली की, म्हशींचा मालक नितेश वैरागर आणि शरद आल्हाट यांनी न्यायालयाचा कोणताही आदेश नसताना गोशाळा चालक चांगदेव भालसिंग याच्याशी संपर्क साधला होता. भालसिंग याने न्यायालयातून म्हशी सोडवायला वेळ लागेल, मी आजच तुमच्या म्हशी देतो असे सांगून स्वतःच्या फायद्यासाठी त्यांच्याकडून २० हजार रुपये घेतले. त्यानंतर भाड्याने पिकअप गाड्या बोलावून या म्हशी रात्रीच्या अंधारात परस्पर त्यांच्या ताब्यात दिल्या.

या सर्व प्रकारात गोशाळा चालकाने पोलिसांची फसवणूक करत आरोपींशी संगनमत केल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून २ लाख रुपये किमतीचे दोन बोलेरो पिकअप टेम्पो आणि १ लाख ८० हजार रुपये किमतीच्या १२ म्हशी असा एकूण ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी गोशाळा चालक चांगदेव गोरख भालसिंग, नितेश बबन वैरागर, शरद जगन्नाथ आल्हाट, अमोल दशरथ कासार आणि शरद गुलाब साठे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल लाड करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### ‘आरोग्याचं सुपर टॉनिक’

झोप हा शरीराचा नैसर्गिक चार्जर आहे, जो दिसत नाही पण आतून ताकद देतो. प्राचीन काळापासून आयुर्वेदात झोपेला ‘जीवनाची धारणा’ मानले जाते आणि आता आधुनिक विज्ञानानेही याला ‘ब्रेन डिटॉक्स’चा दर्जा दिला आहे. चांगली झोप रोगप्रतिकारशक्ती, स्मरणशक्ती आणि मनःशांतीने समृद्ध असते. यातील खास ‘मेलाटोनिन’ नावाचे हार्मोन शरीराची अंतर्गत घड्याळ सुधारते, ताण–तणाव कमी करते आणि पेशींची दुरुस्ती करण्यास मदत करते. हृदयविकार टाळण्यासाठी गाढ झोप रामबाण आहे कारण ७–८ तास झोपेतून हृदयाला पूर्ण विश्रांती मिळते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी चांगली झोप उत्तम आहे, कारण यात भूक वाढवणारे हार्मोन्स कमी होतात आणि पचनक्रिया सुधारते. मेंदूचे कार्य वाढते तर नैराश्य व चिंतेसारख्या आजारांपासून बचाव होतो. दिवसभराचा थकवा घालवण्यासाठी, त्वचा तजेलदार करण्यासाठी आणि केसांच्या आरोग्यासाठीही पुरेशी झोप उपयोगी ठरते. आयुर्वेदात झोपेला ‘भूतधात्री’ व ऊर्जा वाढवणारी क्रिया मानले आहे. शांत–गडद खोलीमुळे ती सहज, नैसर्गिक आणि कोणत्याही गोळीशिवाय मिळते.

## पाककला

### पनीर गुलकंद रोल

**साहित्य :** पनीर २०० ग्रॅम, खवा १०० ग्रॅम, पिठीसाखर १/२ वाटी, गुलकंद ३ चमचे, वेलची पूड १/२ चमचा, पिस्ता काप २ चमचे, गुलाब पाकळ्या १ चमचा, तूप १ चमचा, मिल्क पावडर २ चमचे, केशर ४–५ काड्या, दूध १ चमचा.

**कृती :** पनीर किसून घ्या. कढईत १ चमचा तूप गरम करून त्यात किसलेले पनीर मंद आचेवर २ मिनिटे परता. त्यात खवा, मिल्क पावडर घालून मिश्रण एकजीव होईपर्यंत परता. गॅस बंद करून मिश्रण कोमट करा. कोमट झाल्यावर त्यात पिठीसाखर, वेलची पूड, दुधात भिजवलेले केशर घालून मळून घ्या. दुसऱ्या वाटीत गुलकंद आणि पिस्ता काप एकत्र करा. पनीरच्या मिश्रणाचे छोटे गोळे करून पोळपाटावर प्लास्टिक पेपर ठेवून पातळ लाटा. लाटलेल्या पापडीवर मध्यभागी गुलकंदाचे सारण ठेवा. हलक्या हाताने रोल करा. तयार रोलवर पिस्ता काप आणि गुलाब पाकळ्या लावून सजवा. सेट होण्यासाठी ३० मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा. थंड झाल्यावर सुरीने १ इंचाचे तुकडे करा. पनीर ताजे आणि मऊ वापरा. मिश्रण जास्त गरम असताना साखर घालू नका, नाहीतर पाणी सुटेल.

## वास्तू

### एकत्र जेवण

* घरात कोणी सतत टीव्हीसमोर जेवत असेल तर राहू दोष लागतो. डायनिंग टेबलावर कुटुंबाने एकत्र जेवायची सवय लावा.
* कचरा दक्षिण किंवा पश्चिम दिशेला ठेवा. ईशान्य कोपऱ्यात कचरा, झाडू, पायपुसणी अजिबात नको.
* घराच्या अंगणात किंवा गॅलरीत उत्तर–पूर्व दिशेला तुळस लावा.

## सौंदर्य

काजळ, मस्कारा तसाच ठेवल्यास डोळ्यांना इन्फेक्शन, पापण्या गळणे असे त्रास होतात. खोबरेल तेल किंवा मेकअप रिमूव्हरने हलक्या हाताने काढा.

## सल्ला

पालक, मेथी, शेपू उकळून घेतल्यावर लगेच बर्फाच्या पाण्यात टाका. रंग अजिबात बदलत नाही. हॉटेलसारखी हिरवीगार भाजी दिसते. शिजवताना झाकण ठेवू नका.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ७ जुलै २०२६

**कालाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, उ.भा.१६।२४, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. व्यापार–व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**वृषभ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**मिथुन :** ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**कर्क :** निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण–घेवाण टाळा.

**सिंह :** आजचा दिवस आपल्या कार्य–योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कन्या :** अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. चांगले भोजन मिळेल.

**तूळ :** बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. त्यांना ठरावीक वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न करा.

**वृश्चिक :** सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य हवे असेल.

**धनु :** हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. कोणाला संताप येईल कोणी दुखावले जाईल असे बोलू नका.

**मकर :** आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्या.

**कुंभ :** आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल.

**मीन :** आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल. आपल्याविषयी गैरसमज निर्माण होतील.

## शब्दगंध क्र. ७४६७ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ■ | ४ | | ५ |
| ६ | | ७ | | | | ■ | |
| | ■ | ८ | | ■ | ९ | १० | |
| ■ | ११ | | ■ | १२ | ■ | | ■ |
| १३ | | | १४ | ■ | १५ | | १६ |
| ■ | | ■ | १७ | १८ | | ■ | |
| १९ | | २० | ■ | | ■ | २१ | |
| | ■ | २२ | | | ■ | २३ | |

**आडवे शब्द :–** १) एक प्रकारची तांबडी माती; गेरू ४) अंतर; तफावत ६) फलंदाज व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक असलेला एक निवृत्त भारतीय क्रिकेटपटू ८) अयोध्येचा राजा; सीतापती ९) काम यशस्वी होण्यासाठी देवाला घातलेले मागणे ११) कपट; कट; कारस्थान १२) बीज; बियाणे १३) अभिक्त मालमत्ता १५) एक प्राणी; अज; बोकड १७) मोठा; थोर १९) पांडवांचे चुलत भाऊ २१) आघात; जखम; वार २२) अयोध्याचे पूर्वीचे नाव २३) किनारा; काठ; तीर

**उभे शब्द :–** १) विधी; नियम; लॉ २) ताब्यातला; अधीन ३) जखमेवर चोळण्याचे औषध ४) आदेश; हुकूम ५) मंदिर वगैरेचा सर्वोच्च भाग; शिखर ७) समुद्र; मर्यादा; अंत १०) दरारा; धाक; जरब ११) कारखान्यात वस्तू उत्पादनाचे काम करणारा १४) सारखा; समान; बरोबर १५) दाट झाडी असलेली जागा १६) कारकीर्द १८) दशा; अवस्था; वाईट स्थिती १९) देवाची संमती; घराच्या छपरावर आच्छादनासाठी घातलेले मातीचे पन्हळ २०) अंगीकारलेले व्रत २१) समान संख्यांचा गुणाकार; नाश

### शब्दगंध क्र. ७४६६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | ह | न | शी | ल | ■ | न | फा |
| ज | र | ■ | ■ | घू | स | ■ | ट |
| ग | ळ | स | र | ■ | फ | र | क |
| ■ | ■ | ब | स | क | र | ■ | ■ |
| क | स | ब | ■ | रं | ■ | छा | या |
| सा | व | ■ | आ | ग | म | न | ■ |
| ब | ■ | ■ | का | ळी | ज | ■ | पा |
| सा | व | का | श | ■ | ला | व | णी |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जगणं फार सुंदर आहे, फक्त बघण्याचा दृष्टिकोन सुंदर पाहिजे. काट्यातही गुलाब शोधता आला पाहिजे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मुंग्या एका रेषेत का चालतात? रस्ता चुकतात का कधी?

मुंग्यांना आपण नेहमी एका मागोमाग एक, शिस्तीत रांगेत चालताना पाहतो. कधी साखरेच्या कणाकडे, कधी मेल्या किड्याकडे, तर कधी भिंतीवरून वर–खाली जाताना. पण प्रश्न पडतो की, या मुंग्यांना कोणी ‘रांगेत चला’ असं शिकवलं का? त्यांचा शाळेत पी.टी.चा तास होतो का? तर याचं उत्तर आहे ‘नाही’. मुंग्यांच्या या शिस्तीचं सगळं रहस्य लपलंय त्यांच्या नाकात, म्हणजे मिशांमध्ये आणि एका खास ‘गंधा’मध्ये. विज्ञानाच्या भाषेत याला ‘फेरोमोन’ असे म्हणतात. हा एक प्रकारचा रासायनिक वास असतो. जेव्हा एखादी कामकरी मुंगी घराबाहेर अन्न शोधायला निघते, तेव्हा ती रिकाम्या हाताने परत येत नाही. तिला साखरेचा कण, पोळीचा तुकडा किंवा काहीही खायला मिळाले की ती लगेच आपल्या वारुळाकडे परत निघते. पण परत जाताना ती एक गमतीशीर काम करते. ती तिच्या पोटाखालून जमिनीवर या फेरोमोनचा एक अतिशय बारीक, न दिसणारा रस्ता तयार करत जाते. हा रस्ता आपल्याला दिसत नाही, पण इतर मुंग्यांना त्याचा वास बरोबर येतो.

आता वारुळात बसलेल्या इतर मुंग्या जेव्हा बाहेर पडतात, तेव्हा त्या आपल्या मिशा म्हणजेच ‘अँटेना’ जमिनीला लावून हा वास हुंगतात. जिथे वास स्ट्राँग आहे, तिथे अन्न आहे हे त्यांना कळते. मग एकामागोमाग एक सगळ्या मुंग्या त्याच वासाच्या रस्त्याने अन्नापर्यंत पोहोचतात. जेवढ्या जास्त मुंग्या त्या रस्त्याने जातात, तेवढा तो वासाचा रस्ता अधिक पक्का आणि स्ट्राँग होतो. म्हणूनच आपल्याला मुंग्यांची लांबलचक रांग दिसते. थोडक्यात, मुंग्यांसाठी हा फेरोमोन म्हणजे ‘गुगल मॅप’च आहे. पण मग मुंग्या रस्ता चुकतात का कधी? हो, नक्कीच चुकतात. कारण हा वासाचा रस्ता काही कायमचा नसतो. समजा जोराचा वारा आला, किंवा कोणी पाणी ओतले, किंवा तुम्हीच फरशी पुसून घेतली, तर तो वासाचा रस्ता पुसला जातो. मग मागून येणाऱ्या मुंग्यांचा गोंधळ उडतो. त्यांचा ‘सिग्नल’ जातो. मग त्या गोल–गोल फिरायला लागतात, सैरावैरा पळतात. याला शास्त्रज्ञ ‘अँट मिल’ असे म्हणतात. काहीवेळा तर मुंग्या गोलाकार फिरून–फिरून दमून मरूनही जातात. पण मुंग्या खूप हुशार असतात. रस्ता चुकला की सगळ्या जणी एकदम थांबत नाहीत. त्यातली एखादी धाडसी मुंगी आजूबाजूला नवीन रस्ता शोधायला लागते. तिला जर अन्न सापडले, तर ती लगेच नवीन फेरोमोनचा रस्ता तयार करते. मग बाकीच्या मुंग्या पुन्हा तिच्या मागे रांगेत चालू लागतात. जर अन्न संपले, तर मुंग्या तो वास टाकणे बंद करतात. हळूहळू तो जुना वास हवेत विरून जातो आणि ती रांग आपोआप बंद होते. म्हणजेच मुंग्यांची शिस्त, त्यांचा एकोपा आणि त्यांचे काम या सगळ्यामागे निसर्गाने दिलेली ही अफलातून ‘वासाची यंत्रणा’ आहे. त्यांचा मोबाईल म्हणजे फेरोमोन, मिशा म्हणजे अँटेना आणि रांग म्हणजे नेटवर्क. जोपर्यंत नेटवर्कची रेंज आहे, तोपर्यंत एकही मुंगी रस्ता चुकत नाही. म्हणूनच पुढच्या वेळी मुंग्यांची रांग दिसली की त्यांना डिस्टर्ब करू नका, कारण त्या बिचाऱ्या आपल्या ‘सिग्नल’वर काम करत असतात.

### दुसऱ्याच्या ताटातले लोणी

एका गावात रमेश आणि सुरेश नावाचे दोन भाऊ राहत होते. रमेश मोठा आणि सुरेश धाकटा. दोघांची शेती शेजारी–शेजारी होती. रमेश खूप कष्टाळू होता. पहाटे उठून तो नांगर धरायचा, उन्हातान्हात राबायचा. त्याची बायको शेण–गोमूत्र शिंपडून, सेंद्रिय खत घालून मेहनतीने भाजीपाला पिकवायची. त्यांच्या शेतात बारमाही हिरवळ असायची. सुरेश मात्र आळशी. त्याला वाटायचं ‘कष्ट करून काय मिळतंय?’.


तो दिवसभर गावच्या पारावर बसून गप्पा मारायचा. त्याची शेती पडीक होती. पण त्याची नजर कायम रमेशच्या शेताकडे असायची. रमेशची टोमॅटो, वांगी, मिरची बघून त्याच्या तोंडाला पाणी सुटायचं. एके दिवशी रमेश शहरात आठवडी बाजाराला गेला. घरी फक्त त्याची बायको होती. हीच संधी साधून सुरेश रात्रीच्या अंधारात रमेशच्या शेतात शिरला. त्याने टोपलीभरून ताजी वांगी, टोमॅटो, कोथिंबीर चोरली. घरी जाऊन बायकोला म्हणाला, बघ, आज झक्कास भाजी केलीस. रमेशपेक्षा आपलीच भाजी भारी. बायकोने भाजी केली. खरंच चव भन्नाट होती. सुरेश रोज रात्री चोरायला लागला.

पण एक दिवस गावात मोठी साथ आली. सगळ्यांना उलट्या, जुलाब सुरू झाले. डॉक्टरने सांगितले, रासायनिक फवारणी केलेली भाजी खाऊ नका. सगळे घाबरले. रमेशच्या घरचे मात्र ठणठणीत. कारण त्यांनी कधीच रासायनिक फवारणी केली नव्हती. तेवढ्यात सुरेशच्या घरून रडण्याचा आवाज आला. सुरेश आणि त्याची बायको–मुलं आजारी पडली होती. कारण तो रोज रमेशच्या बांधावरून भाजी चोरायचा, पण रमेश शेजाऱ्यांच्या सांगण्यावरून बांधावर मुद्दाम औषध फवारायचा, जेणेकरून जनावरं नुकसान करणार नाहीत. तीच फवारलेली भाजी सुरेशने चोरून खाल्ली.

रमेशला कळल्यावर तो धावत आला. सुरेशला दवाखान्यात नेले. सुरेश रडत म्हणाला, दादा, मला वाटलं तुझ्या ताटातलं लोणी जास्त गोड आहे. पण ते कसं पिकवलंय हे मला माहितच नव्हतं. माझ्या आळसाने मला खाल्लं. रमेश हसला आणि म्हणाला, अरे वेड्या, माझ्या शेतात राबलास असतास तर हे लोणी तुझ्यापण ताटात आलं असतं. दुसऱ्याचं चांगलं दिसतं, पण त्यामागचे कष्ट दिसत नाहीत. तेव्हापासून सुरेश सुधारला. त्याने स्वतःची शेती करायला सुरुवात केली. वर्षभरात त्याचं शेतही हिरवंगार झालं.

तात्पर्य : दुसऱ्याच्या ताटातले लोणी नेहमीच जास्त आणि गोड दिसते. पण ते मिळवण्यासाठी त्याने किती कष्ट केले, हे आपल्याला माहित नसते.

## आत्मशक्ति



ही ’कारणा’ची उपमंडळे आहेत. ही उपमंडळे ह्या जगांतील सर्व वस्तूहून वेगळी आहेत. ह्यांचे वर्णन मानवाच्या कोणत्याही भाषेत करता येत नाही. ती अवर्णनीय आहेत. ही प्रकाश व ज्ञानाची क्षेत्रे आहेत जे आत्म्याला त्याच्या सत्कर्मानुसार प्राप्त होतात. निर्वाण म्हणजे परमेश्वरात लय होणे. जे आत्मे जीवनमरणाच्या चक्रात फसले आहेत, ते मोहमयी जीवन जगतात आणि पृथ्वीवर पुनश्च जन्म घेण्यापूर्वी अंतरीच्या मंडळातील प्रवासास विसरून जातात.

मागे दिलेल्या विविध धर्म, जाती व संप्रदायामध्ये आत्म्याच्या अमरपणाबाबत जे काही आलेले आहे, ते केवळ योगायोगाने आले आहे असे नव्हे.

### आत्मिक बळकटी

सर्व संतांच्या, महात्म्यांच्या, पैगंबरांच्या आणि जागृत पुरुषांच्या सांगण्यामागे काही सत्य आहे. प्रश्न असा उभा राहतो की, या सर्व वर्णनामागे असा काही पुरावा आहे का की, जो हे सारे वैज्ञानिक दृष्टीने सिद्ध करून त्या सिध्दांतास बळकटी देईल ?

प्राचीन काळच्या साधुसंताच्या आत्मिक वर्णनाला बळकटी देणारे एक नवे ज्ञानाचे दालन १९७० मध्ये उपलब्ध झाले. एका इंग्लिश डॉक्टरांना, डॉ. रेमन्ड मूडी ह्यांना असे आढळून आले की, ज्या लोकांना मृत असे जाहिर केले, परंतु नवीन उपचार पद्धतीने ते पुनः जीवंत झाले, असे सारेजण, त्यांना मिळालेल्या अनुभवाबद्दल सारखेच वर्णन करतात. बहुतेकांनी सांगितले की, त्यांनी स्वतःस आपल्या शरीराहून अलग झाले असल्याचा अनुभव घेतला.

एका सोयीच्या जागी उदा.इमारतीच्या छताचे आसपास असलेल्या आत्म्याने आपल्या मृत शरीराला पाहिले. डॉक्टर मंडळी त्याला पुनः जीवंत करण्यासाठी धडपड करीत असल्याचे त्याने पाहिले. त्यांची आपसातील बोलणी ऐकली.

काही लोकांनी हवेत तरंगत, भिंतीवरून जाऊन बाहेरच्या प्रतीक्षालयांत बसलेल्या सख्या–सोबत्यांना व नातेवाईकांना पाहिले. त्यांच्या गप्पा ऐकल्या. उपचारानंतर जीवंत झाल्यावर त्यांनी ह्या पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टींबाबत नातेवाईक व मित्रांना विचारले. ते सारे खरे असल्याचे त्यांना कळाले.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

चांगुलपणात भर पडावी अशा सुप्त इच्छा आपल्यात असू शकतात. असं असेल तर देण्याच्या बदल्यात काही मिळावं ही इच्छा देण्याच्या कर्मातच समाविष्ट आहे. देण्याचीसुद्धा एक सर्वोच्च पायरी आहे. आपण एखाद्या गरजवंताला मदत करतो आणि विचार करतो की हे आपल्या दोघांच्याही फायद्याचं असेल. ही देण्याची सर्वोच्च पायरी आहे. हा देण्याचा जागृत मार्ग आहे. पण ह्याही पुढची पातळी म्हणजे देण्याच्या बदल्यात काहीतरी मिळावं असा लहानसा विचारही मनात न येता केलेली सेवा. जशी एक आई आपल्या बाळाची निःस्वार्थपणे काळजी घेते तशीच

### सुप्त ईच्छा

ही निःस्वार्थ सेवा आहे. पण कदाचित आईसुद्धा असं काही मर्यादित काळासाठीच करू शकते.

सुरेश ओबेरॉय : मूल जसं मोठं होईल तसं आईदेखील तिच्या म्हातारपणात त्याच्या आधाराची अपेक्षा करेल.

शिवानीदीदी : आजच्या काळात आपण आपल्याकडे असणाऱ्या सर्व गोष्टी इतरांबरोबर वाटून घेण्याचा प्रयत्न करू शकतो. या पायरीवर आपल्यात खूप प्रगती होईल. आपण सगळं काही आपल्यापुरताच ठेवता कामा नये. ’आपण जितकं जास्त देतो, त्यापेक्षा जास्त आपल्याकडे राहतं,’ हा निसर्गाचा आणि अध्यात्माचा नियम आहे. पण देताना त्यामागे एखादी सुप्त इच्छा तर दडलेली नाही ना हे पाहायला हवं.

देणं म्हणजे देऊन टाकणं आणि त्यापुढे पूर्णविराम लावणं, त्याबदल्यात कोणतीही अपेक्षा न ठेवणं. अशा प्रकारच्या देण्यामुळे आत्मा विकसित होतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आई : बाळा, ऑनलाइन क्लास सुरू आहे ना? कॅमेरा बंद का?
पोरगा : अगं आई, मॅडम म्हणाल्या ’तुमचे डोळे पुस्तकात पाहिजेत’.
मी डोळेच कॅमेऱ्याला लावले, म्हणून कॅमेरा बंद केला

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातला एकमेव असा देश कोणता, ज्याचा राष्ट्रीय ध्वज चौरस म्हणजे स्क्वेअर आकाराचा आहे? – स्वित्झर्लंड

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### बिट

या सर्व गुणधर्मामुळेच त्याचा औषधी वनस्पती म्हणून वापर करण्यात येतो. यामध्ये नैसर्गिक साखर विपुल प्रमाणात असूनही उष्मांक अगदी कमी प्रमाणात असतात. हे बिटाचे वैशिष्ट्य आहे. तसेच बीट हे ॲमिनो ॲसिडने समृद्ध असते.

उपयोग :

१) बिटामध्ये असणाऱ्या लोहामुळे रक्तातील लाल पेशींचे व लोहाचे प्रमाण वाढून रक्ताचे प्रमाण प्राकृत राहते, म्हणूनच रक्ताल्पता (निमिया) असणाऱ्या रुग्णांनी आहारामध्ये नियमितपणे बिटाचा समावेश करावा.

२) बालकांनी तसेच स्त्रियांनी नेहमी आहारात बीट वाफवून किंवा त्याची कोशिंबीर करून खावे. बीट हे शक्तिवर्धक असल्यामुळे लहान मुलांची शक्ती वाढते, तसेच स्त्रियांना अनेक वेळा रक्ताची कमतरता असते. ती कमतरता भरून रक्ताचे प्रमाण प्राकृत होण्यासाठी व अशक्तपणा दूर होण्यासाठी नियमितपणे बीट खावे.

३) बिटामध्ये अल्कली गुण, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम, लोह हे घटक असल्यामुळे शरीराला

अतिरिक्त आम्लामुळे होणारा त्रास नाहीसा करण्यासाठी बिटाचा रस काढून प्यावा. हा रस प्यायल्याने मूत्रपिंड, पित्ताशय, आतडे स्वच्छ होते व शरीरातील अतिरिक्त आम्ले ही मूत्रावाटे किंवा शौचावाटे बाहेर पडतात.

४) हृदयरोग, मधुमेह, हाय कोलेस्टेरॉल असणाऱ्या व्यक्तींनी साखरेऐवजी गोड पदार्थ म्हणून बीट खावे. यामध्ये कमी प्रमाणात उष्मांक असल्यामुळे तसेच यातील साखरही नैसर्गिक असल्यामुळे कोणतेही दुष्परिणाम न होता साखर लगेचच रक्तात शोषली जाते.

५) गाजर, दुधी भोपळा या प्रमाणेच बिटाचाही हलवा करता येतो किंवा या तिन्हींचाही मिळून एकत्र हलवा केल्यास तो शरीरासाठी जास्त आरोग्यपूर्ण, रुचकर व शक्तीदायक होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाचा गांधर्व परीक्षेत यशाचा झेंडा

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या गांधर्व परीक्षेत श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यंदाही घवघवीत यश संपादन केले आहे. गायन व भरतनाट्यम या दोन्ही विभागांतील प्रारंभिक ते विशारद पूर्ण स्तरावरील परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी विशेष योग्यता, प्रथम व द्वितीय श्रेणीसह उल्लेखनीय यश मिळवले आहे.

गायन विभागात प्रारंभिक परीक्षेत अक्षरा ठाकरे व तितिक्षा चौरे यांनी प्रथम श्रेणी मिळवली. प्रवेशिका प्रथम परीक्षेत श्रीयांश घोडके याने विशेष योग्यता प्राप्त केली, तर प्रवेशिका पूर्ण परीक्षेत शौर्या चौधरी व अंजली चौधरी यांनी द्वितीय श्रेणी मिळवली.

भरतनाट्यम विभागाच्या प्रारंभिक परीक्षेत अन्वी भोईटे, श्रिया कर्णिक, अद्विता घोडके, आर्या डहाळे, जानवी बोरुले, शर्वी लाटे, त्रिशा लहारे, मुग्धा भालेराव, कल्याणी मोरे, अनया शेळके, स्वस्तिका गोरे, वेदिका साठे, ज्ञानदा नेटके, माहीरा डोमे, सर्वांगी आंबेकर, अनुष्का गवांडे, संचिती जगताप, सृष्टी शेटे, कृतिका किरवे, ईश्वरी माने, ईश्वरी रोहकले, काव्या गोरे, आर्या बर्वे, श्रुतिका झगडे व तन्वी उंडे यांनी विशेष योग्यता व प्रथम श्रेणी प्राप्त केली.

प्रवेशिका प्रथम परीक्षेत ग्रीष्मा सुपलकर, गार्गी सोमवंशी, अनुजा लगड, रिजुल शिंदे, शांभवी क्षीरसागर, लोषिता ताटी, गिरिजा रायकर, शरण्या तोडकर, सियल पारख, आराध्या डोमे, दर्शना धुमाळ, प्रनवी पिसाळ, रेवती घोटणकर, स्नेहा विखे, स्पृहा जहागीरदार, जिज्ञा जाधव, ज्ञानेश्वरी झगडे, देविका साळुंखे, मृणाली नवले व लक्ष्मीप्रिया पंतम यांनी विशेष योग्यता, प्रथम व द्वितीय श्रेणीत यश मिळवले.







यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका वर्षा पंडित, संचालक चंद्रकांत पंडित आदी.

प्रवेशिका पूर्ण परीक्षेत मृत्युश्री बाबू, वेरोनिका जाधव, तनया येनगुल, नेहा ओहोळ, सिया कानडे, जीविता इंगळे, दूर्वा गायकवाड, श्रावणी बनकर, शुभ्रा मस्तोळी, अर्णवी कवाद, चैत्रवेणी ताटी, सिद्धी सालके, स्नेहल सालके, अनुष्का जठार, उर्मिला जठार, स्वप्नजा निरवणे, शीतल घनगावकर व शिल्पा व्यवहारे यांनी उत्तम गुणांसह यश संपादन केले.

मध्यमा प्रथम परीक्षेत मानवी डेरे, प्राजक्ता चव्हाण, दिव्या राणे व अद्विता मेतकर यांनी विशेष योग्यता व प्रथम श्रेणी मिळवली. मध्यमा पूर्ण परीक्षेत ध्रुवी पोटे, सेजल क्षीरसागर, अनन्या तुंगार व समृद्धी कुटे यांनीही विशेष योग्यता व प्रथम श्रेणी प्राप्त केली.

विशारद प्रथम परीक्षेत स्वरा जंगले, गोजिरी भावसार, पारिजा मगर व तनिष्का शेळके या उत्तीर्ण झाल्या. विशारद पूर्ण परीक्षेत ईश्वरी काळे, रिया सरोवरे, दर्शना दंडवते व शर्वरी भंडारी यांनी उल्लेखनीय यश मिळवत विशारद पूर्ण (भरतनाट्यम) ही पदवी संपादन केली.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका, नृत्य तपस्वी वर्षा पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे सहसंचालक चंद्रकांत पंडित यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## धर्मसंस्कृतिसंबंध खांडला

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन संकलन: दिशान फिचर्स



डॉ. मधुकर आष्टीकर लिखीत नंदादीप प्राजक्त प्रकाशन ९८९०९५६६९५

मी जिची आतुरतेने पाहत होतो वाट, ती उजाडली आज पहाट. अगदी कालच्या परवाच्या पहाटेसारखाच तिचा थाट, कोणी अडवू शकला नाही तिची वाट, ऋग्वेद म्हणतो पहाटेच्या वाटेला जे गेले, त्यांचीच लागली वाट तो ऋषी पुढं म्हणतो, ही पहाट अशीच उगवते लागोपाठ. हा तिचा युगायुगांचा परिपाठ ऋग्वेदातील संकुसुक यामासन नावाचे ऋषी म्हणतात. यथाहान्यपूर्व भवन्ति यथाऋतच ऋतुभियन्ति साधु यथा न पूर्णमपरो जहात्येवा धातरायुंषि कल्पयैषाम।।

प्रत्येक पहाट पूर्वीच्या पहाटेप्रमाणेच परमसुखदायी. आजच्या पहाटेची कालच्या पहाटेशी जुळलीय नाडी. पूर्वजांशी त्यांनी कधी तोडली नाहीत नाती. निसर्गातील ऋतुंचेदेखील असेच नाही का? कसे नियमितपणे येतात हे ऋतू. त्यांचे परस्परांशी जुळलेले तंतू. हे विधात्या आमच्याही आयुष्यांची रचना अशीच होउ दे. सुखाची पहाट, अशीच रोज नियमितपणे उगवू दे. ती असो सारखीच आनंद देणारी. ती असो आमची एकसारखीच सुखसमृद्धी साधणारी. बहरो वसंत सदा आमच्या जीवनी न पडो कधी खंड कधी न येवो आमच्या नशिबी दुःखदंड. पण त्यासाठी आम्ही सोडू नये कधी आमच्या पूर्वापार संस्कृतीचा तो मानदंड ती विश्वललामभूत भारतीय सभ्यता, साध उन्नती उदंड. तिच्याशी संबंध टिकावा. नातवाने आजोबांशी सदैव संबंध जोडावा. पूर्वापार चालत आलेला धर्म आणि रीतीरिवाज आम्ही सातत्याने पाळावा. हे विधात्या, आम्हाला तशी प्रेरणा दे. आम्ही पूर्वजांना विसरणार नाही. आईवडिलांच्या आज्ञेबाहेर जाणार नाही. वाडवडिलांशी नाते तोडणार नाही. आम्ही त्यांना कधी दुखावणार नाही. अशी तू आम्हाला पावन बुद्धी दे.

वाडवडिलांशी गुंतलेले जिव्हाळ्याचे लागेबांधे तोडले की, माणसाचे जीवन मोडले. स्वामी समर्थ रामदासांनी अशा दुर्दैवी जिवाचे चित्र रेखाटताना म्हटले. नाही नाही ती कर्मे केली म्या परिवारासमंधे चोरी जोरी अदभुत केली स्वये मंदांधे। आचार विचार सांडला । वाडवडिलांशी तंडला । धर्मसंस्कृतिसंबंध खांडला ।।

एक मजेदार लोककथा आहे. एक होता शिंपी. एका रात्री त्याच्या दुकानासमोर आला एक कुबडा. मागू लागला भाकरीची तुकडा. शिंप्याने त्याला अतिथी म्हणून आत घेतले. पोटभर जेवायला दिले. शेवटी तो चिंचेचं सार प्याला आणि त्याला जोरदार ठसका लागला. तो बेशुद्ध होऊन पडला. घाबरला. त्याने व त्याच्या पत्नीने त्याला उचलून डॉक्टराकडे नेला. डॉक्टर माडीवर राहत होता. शिंप्याने त्या कुबड्याला वर उचलून नेले. शेवटच्या पायरीवर ठेवले व डॉक्टरांना हाक मारली. तेवढ्यात कुबड्यानं मान टाकली. शिंपी व त्याची बायको घाबरून पळाली.

डॉक्टर बाहेर आले. जिन्यात अंधार होता. त्यांना कुबडा दिसला नाही. त्यांचा धक्का लागून तो पायऱ्यांवरून गडगडला. डॉक्टर घाबरले. कुबडा मेला. आता ते पार भ्याले त्यांनी त्या कुबड्याचा मृतदेह बाजूच्या व्यापाऱ्याच्या धुराड्यातून आत सोडला. व्यापाऱ्याच्या घरात तो धपदिशी पडला. व्यापारी झोपेतून जागा झाला.

आवाज कसला? चोर शिरला. कुबडा जमिनीवर दिसला. व्यापाऱ्याने काठीने बदडला. दिवा लावला. व्यापारी भ्याला. कुबडा मेला ? मग त्याने त्याला पहाटेच्या वेळी बाहेर नेऊन भिंतीशी उभा केला.

तिकडून एक तरुण पहाटेच्या वेळी रोजच्याप्रमाणे धावत आला. त्याचा त्या कुबड्याला धक्का लागला. कुबडा जमिनीवर आदळला तरुण भ्याला. तेवढ्यात एक शिपाई तिकडून आला. कुबड्याचा मृतदेह व तरुणाला घेउन गेला. तरुण खुनी.

तरुणाला झाली फाशी. ते व्यापाऱ्याला कळले. निरपराध फाशी जावा? त्याचे जुने चांगले संस्कार जागे झाले. असा खोटेपणा बरा नव्हे. तो धावत गेला. याला फाशी देऊ नका. अपराध माझा आहे म्हणाला. मग व्यापारी फाशी जाणार. डॉक्टरला कळले. त्याला वाईट वाटले. आपण अपराधी व फाशी जाणार व्यापारी? तो डॉक्टर धावत गेला. व्यापारी सुटला. डॉक्टरला आता फाशी होणार? शिंप्याचे संस्कार जागे झाले. निरपराध्याला का फाशी जाऊ द्यायचे? पाप आपले व शिक्षा डॉक्टरला ? तो धावत गेला. अपराध माझा म्हणाला. मग शिंप्याला पकडले. डॉक्टर ऐवजी त्याला फाशी देणार. तेवढ्यात त्या कुबड्याला जोरात खोकला आला. तो उठून उभा राहिला. पोटभर जेवू घालणाऱ्या पुण्यवान शिंप्याच्या पाया पडला.

**– किशोर गांधी**

# फिरोदिया प्रशालेच्या १० विद्यार्थ्यांनी मिळवले शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान

नगर – शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा सातत्याने जपणाऱ्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता पाचवीतील तब्बल १० विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळविले असून त्यांना प्रतिवर्षी पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे.



शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेले सविता रमेश फिरोदिया प्रशालेचे विद्यार्थी.

जिल्हा गुणवत्ता यादीत त्वरिता सुरेश लगड (२५६ गुण), राजनंदिनी सागर गायकवाड (२५४), वेदिका अवधूत वाघचोरे (२५४), पायल किरण गायकवाड (२३८), हर्ष राहुल बोराडे (२३२), ओमकार नितीन चेमटे (२३०), आदर्श दत्तात्रय माळी (२२६), आदर्श उद्धव गर्जे (२१८), स्वराज बाबासाहेब कांडेकर (२१६) आणि गौरव गणेश माडगे (२०६) यांनी स्थान मिळविले. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र. धो. कासवा, सहसचिव राजेश झालानी, खजिनदार ड. विजयकुमार मुनोत यांच्यासह सर्व विश्वस्त उपस्थित होते.

चेअरमन दिलीप गुंदेचा म्हणाले, आजचा काळ हा ज्ञान, कौशल्य आणि नवोन्मेष यांचा संगम आहे. अशा स्पर्धात्मक परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला चालना मिळते, आकलनशक्ती वाढते आणि ते पाठांतरापलीकडे जाऊन संकल्पनात्मक शिक्षणाकडे वळतात. सविता रमेश फिरोदिया प्रशालेने नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले असून ही यशाची परंपरा पुढेही कायम राहील.

सहसचिव राजेश झालानी यांनी विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न लागता ज्ञानाच्या शोधात राहण्याची गरज व्यक्त केली. अशा परीक्षांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जिद्द आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित होत असल्याचे सांगत संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे त्यांनी नमूद केले. उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र. धो. कासवा आणि खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका योगिता गांधी यांनी प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या, पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणाऱ्या असून त्यातून स्पर्धात्मक वृत्ती, आत्मविश्वास आणि अभ्यासातील सखोलता वाढीस लागते. विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या परिश्रमांबरोबरच शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचे व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळालेल्या पाठबळाचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले.

# वीर हनुमान पायी दिंडी सोहळ्याचे १४ जुलैला अहिल्यानगरहून प्रस्थान

नगर – सालाबाद प्रमाणे वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठाण च्या वतीने अहिल्यानगर ते पंढरपूर आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्याचे मंगळवार, १४ जुलै रोजी सकाळी १० वा हनुमान मंदिर, मार्केट यार्ड येथून प्रस्थान होणार आहे, अशी माहिती अध्यक्ष दत्ता बाबासाहेब जाधव यांनी दिली.

यावेळी दिंडी सोहळा विषयी बोलताना अध्यक्ष दत्ता जाधव म्हणाले की, मागील २३ वर्षांपासून आम्ही या दिंडी सोहळ्याचे आयोजन करत आलो आहोत आमची दिंडी अतिशय शिस्तबद्ध व वेळेचे पालन करणारी आहे. या दिंडीमध्ये जर भाविकांना सहभागी व्हायचे असेल तर त्यांनी ९४०५००१४७४,९४०४६१५१५१,९५८८२६३१३१,९९२३६८११२२,७७७६८८७७११ या मोबाईल नंबर वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे

दिंडी यशस्वीतेसाठी मार्गदर्शक बाबासाहेब भाऊसाहेब जाधव यांचे सहकार्य मिळत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष नंदू गाडळकर, सचिव झुंबर आव्हाड, खजिनदार मनोज आजबे, ह.भ.प .संजय महापुरे, रामदास कानडे, गोविंद सांगळे, राजेंद्र कानडे, विक्रांत राऊत, मिमराज रासकर, यशवंत ओटी, छबु गाडळकर, शंकर रासकर आदी प्रयत्नशील आहे तसेच या दिंडी काळात श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथजी महाराज या दिंडीत सहभागी होणार आहेत. तसेच या संपूर्ण दिंडी कालावधीत रोज रात्री मुक्कामाच्या ठिकाणी किर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहेत. यामध्ये ह.भ.प.संजय महाराज महापुरे, ह.भ.प.अमित महाराज धाडगे, ह.भ.प.प्रसाद महाराज देव, ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे, श्रीराम भक्त सत्संग सेवा मंडळ यांचा हनुमान चालिसा पाठ, ह.भ.प. राजेंद्र महाराज शहाणे, ह.भ.प. किशोर महाराज जाधव, ह.भ.प. मच्छिंद्र महाराज भोसले, ह.भ.प. बाबासाहेब गोलांडे यांचा भारुडाचा कार्यक्रम, वैराग्य मूर्ती ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज डांगरे, स्वामी अमृतानंद सरस्वती, कृष्ण कृपाकींत डॉ. विकासनानंद महाराज मिसाळ आदींची कीर्तन सेवा मिळणार आहे

या दिंडी कालावधीत रोज कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे .तसेच श्रीराम भक्त सत्संग सेवा मंडळाच्यावतीने हनुमान चालीसा पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र भक्त सेवा ट्रस्ट अहिल्यानगर यांच्या वतीने रविवार, २६ जुलै रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी जास्तीत भाविकांनी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन कऱण्यात आले आहे.

# श्री सत्यसाईबाबांच्या पादुकांसह रथयात्रेचे नगरमध्ये जल्लोषात स्वागत

नगर – श्री सत्यसाईबाबांच्या पादुकांसह निघालेल्या रथयात्रेचे अहिल्यानगर शहरातील सक्कर चौकात आगमन झाल्यानंतर जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. पुष्पवृष्टीने सजलेल्या या रथयात्रेदरम्यान टाळ-मृदंगाच्या निनादाने संपूर्ण परिसर साईमय झाला. भाविकांनी उच्च स्वरात श्री सत्यसाईबाबा की जय असा जयघोष करत यात्रेचे उत्साहात स्वागत केले.



सत्यसाईबाबांच्या पादुकांचे नगरमध्ये आगमन झाल्यानंतर टाळ-मृदंगाच्या गजरात स्वागत करण्यात आले.

ही रथयात्रा काष्टी येथे आल्यानंतर तेथे जिल्ह्याच्यावतीने स्वागत करुन ही रथयात्रा कायनेटिक चौक येथे पोहोचली असता तेथून मोटारसायकल व सायकल रॅली काढण्यात आली. सक्कर चौकात रथयात्रा दाखल होताच साईभक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला. ठिकठिकाणी रथावर पुष्पवृष्टी करण्यात येत होती. सक्कर चौकातून पुढे निघालेली शोभायात्रा नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स येथे पोहोचली. या प्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे यांनी श्री सत्यसाईबाबांच्या दिव्य पादुकांना नतमस्तक होऊन दर्शन घेतले. श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हाप्रमुख अशोक कुरापाटी यांच्या हस्ते त्यांचा शाल व ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. त्या म्हणाल्या, मानवता, बंधुत्व आणि ईश्वरी पितृत्व या वैश्विक भावनेतून सत्य, धर्म, शांती, प्रेम व एकता यांचे संदेश देत निघालेली श्री सत्यसाई प्रेमवाहिनी रथयात्रा नगरमध्ये येणे हे नगरकरांचे भाग्य आहे. श्री सत्यसाई सेवा संघटनेने अत्यंत सुंदर नियोजन करून स्थानिक नवकलाकारांना नृत्य, संगीत व अभिनय सादरीकरणाची संधी दिली असून हे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

शोभायात्रेच्या अग्रभागी घोडेस्वार, तुतारीवादक, बँड पथक, महिलांचे लेझीम पथक तसेच आळंदी येथील हभप ज्ञानेश्वर महाराज कावरे यांच्या तुकोबाराय वारकरी शिक्षण संस्थेचे बाल वारकरी पथक सहभागी झाले होते. बालविकासचा बालचमू प्रबोधनात्मक फलकांसह सहभागी झाला होता. बालविकास गुरू, पालक, ज्येष्ठ नागरिक व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रथामधील पादुकांचे वेदपठणासह विधीवत पूजन वेदमूर्ती उमेश वाळुंजकर यांच्या पौरोहित्याखाली करण्यात आले. साईभक्तांनी मंगल महाआरती केली. यावेळी विविध धर्मगुरूंच्या उपस्थितीत सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना झाली. ज्योती श्रोत्री, रेखा शर्मा व अनिल शर्मा यांनी बालविकास विद्यार्थ्यांसह वेदसार पठण केले. अमृता बेडेकर, स्वप्ना बेडेकर, श्रेया सुवर्णपाठकी व अनुजा कुलकर्णी यांनी अथर्वशीर्ष पठण सादर केले. त्यानंतर सांस्कृतिक महोत्सवाला सुरुवात झाली. शहरातील विविध नृत्यालयांच्या कलाकारांनी सादर केलेल्या नृत्यप्रयोगांना भाविकांनी भरभरून दाद दिली. सलग सादरीकरणांनी टाळ्यांचा कडकडाट होत वातावरण भक्तिमय झाले. आरती पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली सत्यसाई बालविकासच्या विद्यार्थ्यांनी भजन सादर केले. कार्यक्रमानंतर भाविकांनी श्रद्धेने भोजनप्रसादाचा लाभ घेतला.

रथयात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हाप्रमुख अशोक कुरापाटी, आध्यात्मिक प्रमुख प्रा. ज्योती कुलकर्णी, अमोल सप्तर्षी, डॉ. शामसुंदर केकडे, ॲड. रावसाहेब मिरीकर, नानासाहेब मिरीकर, स्वाती मिरीकर, नंदलाल व नलिनी भालेराव, नरसिंग व शोभा दुसा, दिलीप मेहेर, विलास नडिमेटला, विजय चावक, फुलचंद भळगट, शकुंतला पाटील, श्रीकृष्ण धर्माधिकारी, नितीन भंडारी, प्रा. काथार, रुक्मिणी संदुपटला, राजश्री राऊत आणि श्रुती केकडे यांच्यासह अनेक साईभक्तांनी परिश्रम घेतले.

# वक्तृत्व स्पर्धेतून महापुरुषांचे विचार समाजासमोर प्रभावीपणे मांडता येतात

## डॉ. राहुल पंडित यांचे प्रतिपादन; पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिनानिमित्त राज्यस्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

नगर – भारतीय संस्कृती ही जगातील सर्वांत प्राचीन, समृद्ध आणि विविधतेने नटलेली संस्कृती असून आज संपूर्ण जग भारतीय सांस्कृतिक वारशाचे अनुकरण करत आहे. वाचनातून व्यक्तिमत्त्व घडते, विचार परिपक्व होतात आणि प्रभावी वक्तृत्वातून समाजप्रबोधन घडते. महापुरुषांचा इतिहास, त्यांचे कार्य, विचार आणि भारतीय संस्कृतीचा गौरव समाजापर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वक्तृत्व होय. विचार भारती संस्थेने राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून युवकांना आपले विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. राहुल पंडित यांनी केले.



पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव आणि अहिल्यानगर गौरव दिन निमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने न्यू आर्ट कॉलेज येथे आयोजित राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन डॉ. राहुल पंडित यांच्या हस्ते झाले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त तसेच पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव आणि अहिल्यानगर गौरव दिन निमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने न्यू आर्ट कॉलेज येथे आयोजित राज्यस्तरीय खुल्या वकृत्व स्पर्धेचे उद्घाटन डॉ. राहुल पंडित यांच्या हस्ते झाले.

यावेळी विचार भारती संस्थेचे राजाभाऊ मुळे, सचिव मनोज झंवर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, चंद्रकांत तागड, राजेंद्र मचे, पुष्कर कुलकर्णी, प्रा. अशोक सागडे, ऐश्वर्या सागडे, प्रा. संदीप कांबळे, प्रा. अनिल गर्जे, प्रा. राधाकिसन जोशी, प्रा. मच्छिंद्र मालुंजकर यांच्यासह स्पर्धक, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी विचार भारती संस्थेचे सचिव मनोज झंवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा, दूरदृष्टीचा आणि लोककल्याणकारी प्रशासनाचा गौरव समाजासमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले आहे. महापुरुषांचे विचार आजच्या युवकांना ऊर्जा, प्रेरणा आणि योग्य दिशा देणारे आहेत. बदलत्या काळात युवकांमध्ये विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी, अभ्यासपूर्ण मांडणीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि समाजाभिमुख नेतृत्व घडविण्यासाठी अशा दर्जेदार वकृत्व स्पर्धांचे आयोजन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक सागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी चंद्रकांत तागड यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेची भूमिका, उद्दिष्टे आणि महोत्सवाची माहिती उपस्थितांसमोर मांडली. पुष्कर कुलकर्णी यांनी आभार मानले.

# रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी-पालक मेळावा उत्साहात संपन्न

नगर – नागापूर एमआयडीसी येथील रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालय येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास विद्यार्थ्यांसह पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.





रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी-पालक मेळावा प्रसंगी मार्गदर्शक करताना शिक्षक. (छाया – समीर मन्यार)

मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना अभ्यासादरम्यान येणाऱ्या विविध अडचणी, परीक्षा तयारी, अभ्यासाचे नियोजन तसेच नियमित उपस्थिती याबाबत शिक्षकांनी पालकांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या शंकांचे निरसन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व शिक्षक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय दरेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यालयातील सर्व शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. गुणवंत शिक्षकांमुळे विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल दरवर्षी शंभर टक्के लागत असून, या यशाचे श्रेय विद्यालयातील सर्व शिक्षक वृंदांना जाते, असे ते म्हणाले.

वर्गशिक्षक संतोष उरमुडे यांनी विद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे गुणवत्तावाढ उपक्रम, नियमित सराव परीक्षा, विशेष मार्गदर्शन वर्ग, पालक-शिक्षक संवाद आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी करण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती पालकांना दिली. यावेळी नंदा दुधाने, निशिगंधा चोभे, रामभाऊ पोटे, जगदीश आव्हाड, सुनंदा शिरसाठ, नितीन शिंदे, चव्हाण आदी उपस्थित होते.

# वीस वर्षांची हरित परंपरा जपत अनुराधा येवले यांनी वटसावित्री पौर्णिमेनिमित्त केली सात वडांची लागवड

नगर – वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्ताने गेल्या वीस वर्षांपासून सातत्याने सात वडांची झाडे लावण्याची हरित परंपरा जपणाऱ्या ॲड. अनुराधा येवले यांनी यंदाही पर्यावरणपूरक उपक्रम राबवत वृक्षलागवड केली. निसर्गाशी नाते दृढ करणारा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश सु. पैठणकर, अहिल्यानगर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.



वटसावित्री पौर्णिमेनिमित्त ॲड. अनुराधा येवले यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात न्यायाधीश योगेश पैठणकर, अहिल्यानगर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांच्या हस्ते वट वृक्षाचे रोपण करण्यात आले.

या प्रसंगी न्यायाधीश योगेश पैठणकर म्हणाले, भारतीय संस्कृतीत वटसावित्री हा सण केवळ धार्मिक परंपरेपुरता मर्यादित नसून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करणारा उत्सव आहे. अशा सणांना प्रत्यक्ष वृक्षलागवडीची जोड देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ॲड. अनुराधा येवले यांनी गेली वीस वर्षे अखंडपणे हा उपक्रम राबविणे अत्यंत कौतुकास्पद असून त्यामुळे समाजात पर्यावरण संरक्षणाची सकारात्मक जाणीव निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमास अहिल्यानगर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे, ॲड. स्वाती पाटील, ॲड. स्वाती नगरकर, ॲड. पल्लवी होनराव, ॲड. रुपाली पठारे, ॲड. शिल्पा बेरड, ॲड. सुरेश भोर, ॲड. रणजित गोरे, ॲड. सचिन पाठक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधीक्षक रवींद्र घोडके, इंद्रजित जाधोर, विकास कर्डिले, अनिल निमसे, आतिष मिरपगार, बाळू कटारनवरे आदी उपस्थित होते.

ॲड. कृष्णा झावरे यांनी सांगितले, वकील हा केवळ न्यायालयापुरता मर्यादित नसून समाजप्रबोधनाची भूमिकाही पार पाडतो. ॲड. अनुराधा येवले यांनी वीस वर्षांची अखंड हरित परंपरा निर्माण करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अशा उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते, असे त्यांनी नमूद केले.

ॲड. अनुराधा येवले म्हणाल्या, वटसावित्री पौर्णिमेच्या धार्मिक महत्त्वाला पर्यावरण संरक्षणाची जोड देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला असून गेली वीस वर्षे सात वडांची झाडे लावण्याची परंपरा अखंड सुरू आहे. या झाडांचे संगोपनही तितक्याच जबाबदारीने केले जाते. प्रत्येक कुटुंबाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन केले, तर मोठी हरित चळवळ उभी राहू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेटस् बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी फारूक शेख

नगर – अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या बैठकीदरम्यान ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. फारूक बिलाल शेख यांची अध्यक्षपदी निवड झाली. या बैठकीसाठी बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी, ॲड. विश्वासराव आठरे पाटील, ॲड. पिंगळे, ॲड. ए. डी. चौधरी, ॲड. सुभाष काकडे, ॲड. के. एम. देशपांडे, ॲड. बिहाणी व इतर वकील बांधव उपस्थित होते.



अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी फारूक शेख यांची निवड झाल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला.

निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना ॲड. फारूक शेख यांनी बार असोसिएशनच्या सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. सदस्यांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत वकिलांच्या हिताचे रक्षण, बार आणि बेंच यांच्यात समन्वय वृद्धिंगत करणे, तरुण वकिलांना प्रोत्साहन देणे, न्यायालयीन सुविधा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे तसेच बार असोसिएशनच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही त्यांनी दिली. या निवडीबद्दल न्यायालयीन व विधी क्षेत्रातील मान्यवर, सहकारी वकील तसेच विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना निकृष्ट आणि बोगस भुईमूग बियाण्यांचे वाटप

## स्वराज्य जनजागृती परिषदेची कृषीमंत्र्यांकडे तक्रार, कठोर कारवाईची मागणी

नगर – खरीप हंगामाच्या तोंडावर श्रीगोंदा तालुक्यासह संपूर्ण राज्यात वितरित करण्यासाठी आलेल्या भुईमूग बियाण्यांच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. राष्ट्रीय खाद्यतेल अभियान योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेल्या या बियाण्यांची उगवण क्षमता अत्यंत कमी असून, त्यांची प्रतवारी निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

या गंभीर प्रकरणी स्वराज्य जनजागृती परिषदेचे टिळक भोस यांनी राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. यामध्ये त्यांनी म्हंटले आहे की, या बियाण्यांमधील शेंगांचा आकार अत्यंत लहान असून गुणवत्ता अत्यंत निकृष्ट आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांनी हे बियाणे घेण्यास थेट नकार दिला असून, खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अशा प्रकारच्या बोगस बियाण्यांचा पुरवठा झाल्याने बळीराजा मध्ये तीव्र नाराजी व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणाची श्रीगोंदा तालुक्याच्या कृषी अधिकारी क्रांती चौधरी यांना कोणतीही पूर्वकल्पना किंवा माहिती नव्हती, असा आरोप तक्रार पत्रात करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी स्वतः कृषी कार्यालयात जाऊन हा प्रकार निदर्शनास आणून दिल्यानंतर या बियाण्यांचे वाटप थांबवण्यात आले. शासनाकडून आलेले बियाणे योग्य आहे की नाही, याची पूर्वतपासणी करण्याची जबाबदारी असताना अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असून, हा केवळ श्रीगोंदा तालुक्यापुरता मर्यादित नसून राज्यभरात असा बोगस साठा वितरित झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाबीज यंत्रणा आणि कृषी विभाग शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यरत असल्याचा दावा करत असताना, अशा प्रकारे बोगस बियाण्यांचा पुरवठा करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या भवितव्याशी खेळण्यासारखे आहे. यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊन उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर स्वराज्य जनजागृती परिषदेने श्रीगोंदा व नगर तालुक्यात वितरित झालेल्या बियाण्यांची प्रयोगशाळेत तात्काळ तपासणी करावी, बियाणे पुरवठादार व बेजबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे.

त्याचप्रमाणे बाधित शेतकऱ्यांना त्वरित दर्जेदार बियाण्यांचा पर्यायी पुरवठा करून आर्थिक भरपाई देण्यात यावी, कामात हलगर्जीपणा करणाऱ्या तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी यांची चौकशी व्हावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी जिल्हा पातळीवर विशेष तपास पथक नेमण्यात यावे, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# श्री सत्यसाईबाबांच्या पादुकांचे शहरातील विविध भागात घरोघरी उत्साहात पूजन

नगर – आंध्रप्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील पुट्टपूर्ती येथून प्रथमच अहिल्यानगर जिल्ह्यात आलेल्या श्री सत्यसाईबाबांच्या चरण पादुकांचे शहरातील विविध भागात घरोघरी उत्साहपूर्ण वातावरणात पूजन करण्यात आले. पादुकांचे रूपाने प्रत्यक्ष श्री सत्यसाईबाबाच आपल्या घरी आले, या श्रध्देने साईभक्तांनी स्वागताची जय्यत तयारी केली होती.



श्री सत्यसाईबाबांच्या चरण पादुकांचे शहरातील विविध भागात घरोघरी उत्साहपूर्ण वातावरणात पूजन करण्यात आले.

प्रेमावतार भगवान श्री सत्यसाईबाबांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रथमच येत असलेल्या पादुकांच्या स्वागतासाठी सडा-रांगोळ्या घालून अंगण सजविण्यात आले होते. घरांना आंब्याच्या पानांची तोरणे लावण्यात आली होती. विविध फुलांचे सुरेख हार लावून तर काही भाविकांनी केळीचे खुंट लावून घरे सजवली होती. घरातील होम थिएटर मंगल वाद्यांच्या मधूर स्वरांनी वातावरण मंगलमय करत होते.

घरातील सर्व मंडळी पारंपरिक वेशभूषेत श्रीसत्यसाईंच्या रथयात्रेसह दिव्य पादुकांची आतुरतेने प्रतिक्षा करत असलेले दिसत होते. पादुकांचे आगमन होताच घरात आनंदाला उधाण येई. भारतीय संस्कृतीतील प्रथेप्रमाणे औक्षण करून पादुकांचे स्वागत करताना सुवासिक फुलांची पुष्पवृष्टी करण्यात येत होती. फटाक्यांची जोरदार आतषबाजी डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली. अत्तराचा सुगंध परिसरात दरवळताना वातावरण अधिक प्रसन्न होत होते.

पादुका पूजन स्थळी करण्यात आलेले सुशोभीकरण लक्ष्यवेधी असायचे. घरातील सर्वांचा श्रद्धाभाव एकवटल्याचे मनोहारी दर्शन घडत होते. पादुकांचे विधीवत पूजन केल्यानंतर प्रथेप्रमाणे सर्व कुटुंब एकत्र बसून पादुकांसमोर ध्यान साधना करत होते.

आपल्या वाड्यात, आपल्या परिसरात, आपल्या कॉलनीत, आपल्या अपार्टमेंटमध्ये, आपल्या फ्लॅटमध्ये, आपल्या बंगल्यात, आपल्या घरात श्रीसत्यसाईबाबांच्या पादुका म्हणजे बाबाच आले, ही श्रध्दा सर्वत्र पहावयास मिळत होती. पादुकांचा घरातील प्रत्येक खोलीत होणारा विहार श्रद्धाभाव वृध्दिंगत करणारा ठरला.

श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हा प्रमुख अशोक कुरापाटी यांनी पादुका पूजनाचे उत्तम नियोजन केले होते. पादुका दर्शनासाठी परिसरातील भाविकांची लक्षवेधी गर्दी झाली तरी सर्वजण शांतपणे शिस्तबद्धतेने दर्शनाचा लाभ घेत असल्याचे दिसून येत होते.

# खुल्या महाराष्ट्र राज्य तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत ७५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

नगर – तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने जिल्हा तायक्वांदो असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने वाडिया पार्क येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित खुल्या महाराष्ट्र राज्य तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत पीव्ही, सब-ज्युनिअर, कॅडेट, ज्युनिअर आणि युथ अशा विविध गटातील ७५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. पुमसे आणि क्योरुगी या दोन्ही प्रकारांमध्ये होत असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग घेतला आहे.



तायक्वांदोपटूंचा सामना लावून स्पर्धेचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप, संदीप ओंबासे, गफार पठाण, डॉ. प्रसाद कुलकर्णी, माणिकराव विधाते, महेश तवले, विशाल पवार, दत्ता गाडळकर आदी.

स्पर्धेचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफार पठाण, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, शहर संघटनेचे अध्यक्ष माणिकराव विधाते, नगरसेवक महेश तवले, विशाल पवार, दत्ता गाडळकर, सुमित लोंढे, सनी वाघस्कर यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच आणि खेळाडू उपस्थित होते.

आ. जगताप म्हणाले, विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच आपल्या आवडीच्या क्रीडा प्रकारातही सक्रिय सहभाग घ्यावा. आज क्रीडा क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि जिद्दीच्या बळावर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करता येते. क्रीडा केवळ पदके मिळवून देत नाही, तर व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि निरोगी जीवनशैली घडविण्यातही महत्त्वाची भूमिका बजावते.

स्पर्धेतील सामने अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक सेन्सर स्कोअरिंग प्रणालीद्वारे खेळविण्यात येत असल्याने प्रत्येक गुणाचे अचूक, निष्पक्ष आणि पारदर्शक गुणांकन होत आहे. जागतिक तायक्वांदो महासंघाच्या निकषांनुसार वापरण्यात येणाऱ्या या तंत्रज्ञानामुळे खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेचा प्रत्यक्ष अनुभव मिळत असून स्पर्धेचा दर्जाही उंचावला आहे. त्यामुळे उपस्थित क्रीडारसिकांनाही उच्च दर्जाच्या तायक्वांदो स्पर्धेचा अनुभव घेता आला.

स्पर्धेच्या आयोजनासाठी जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे संजय आनंदकर, राज्य उपाध्यक्ष घनश्याम सानप तसेच अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानचे संचालक महेश आनंदकर, गणेश वंजारे, धर्मनाथ घोरपडे, ऋषिकेश घोडेकर, चेतन जावळे, कार्तिक मोढवे, सार्थक कराळे, मंगेश आहेर, योगेश बिचितकर, सचिन मरकड यांच्यासह पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच आदी परिश्रम घेत आहेत. राज्यातील गुणवंत तायक्वांदोपटूंना दर्जेदार स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने स्पर्धांचे आयोजन करण्याचा तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा उपक्रम राज्यातील तायक्वांदोच्या विकासाला निश्चितच चालना देणारा ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

### तायक्वांदो खेळाडूंसाठी करिअरच्या नव्या संधी

तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ही महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची मान्यताप्राप्त राज्यस्तरीय क्रीडा संघटना आहे. संघटनेमार्फत आयोजित अधिकृत स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना राज्य शासनाच्या ५ टक्के क्रीडा आरक्षणाचा लाभ मिळण्याची संधी उपलब्ध होत असून, त्यामुळे तायक्वांदो हा खेळ राज्यातील खेळाडूंसाठी उज्वल करिअरचा प्रभावी पर्याय ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये करिअर संधी कार्यशाळा पार पडली.

# द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये करिअर संधी कार्यशाळा

नगर – बदलत्या काळातील करिअरच्या विविध संधींची ओळख करून देत विद्यार्थ्यांना भविष्यासाठी योग्य दिशा निवडता यावी, या उद्देशाने द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर संधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यशाळेत मनास्पर्शा कौन्सेलिंग ॲण्ड ट्रेनिंग सेंटरच्या समुपदेशक सुकन्या फणसळकर यांनी मार्गदर्शन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, क्षमता, व्यक्तिमत्त्व आणि कौशल्यांची ओळख करून देण्यात आली. तसेच पारंपरिक करिअर क्षेत्रांबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स, डिझाइन, डिजिटल मीडिया, उद्योजकता आणि मानसशास्त्र यांसारख्या उदयोन्मुख करिअर क्षेत्रांची सविस्तर माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. आत्मपरीक्षण, कौशल्यविकास, योग्य नियोजन आणि भविष्याभिमुख दृष्टिकोन यांचे महत्त्व समजावून सांगताना, स्वतःच्या क्षमता व आवडीनुसार करिअरची योग्य दिशा निवडण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

ही कार्यशाळा द आयकॉन पब्लिक स्कूलच्या शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती असलेल्या कटिबद्धतेची प्रचिती देणारी ठरली. यावेळी शाळेच्या पॅट्रन मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, डायरेक्टर ॲडमिनिस्ट्रेशन कर्नल आर. सी. राणा, ट्रस्टी निर्मल मुथा आणि अमित मुथा यांनी या उपक्रमाचे कौतुक करत मार्गदर्शक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# इतर मागासवर्गीय वित्त महामंडळाच्या विविध कर्ज योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

नगर – राज्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकासासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच त्याच्या १३ उपकंपन्यांमार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात इतर मागासवर्गीय प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांनी विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

महामंडळामार्फत २० टक्के बीजभांडवल कर्ज योजना, एक लाख रुपये थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना तसेच महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना अशा एकूण सहा योजना राबविण्यात येत आहेत. यापैकी एक लाख रुपये थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना आणि महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना या पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येतात. या योजनांसाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रथम नावनोंदणी करून त्यानंतर ऑनलाइन अर्ज सादर करावेत. तर २० टक्के बीजभांडवल कर्ज योजना ऑफलाइन पद्धतीने राबविण्यात येत असून, या योजनेचे विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा कार्यालयातून उपलब्ध आहेत.

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा (०२४१) २४५००३० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

# थॅलेसेमिया मुक्त अहिल्यानगर जिल्हा अभियानअंतर्गत निशुल्क तपासणी शिबिर

नगर – नालेगाव येथील जनकल्याण रक्त केंद्रात थेलेसेमिया मुक्त अहिल्यानगर जिल्हा अभियानांतर्गत निशुल्क थेलेसेमिया तपासणी, सीबीसी टेस्ट, आणि समाज प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला.



जनकल्याण रक्तपेढी येथे थॅलेसेमिया मुक्त अहिल्यानगर अभियानांतर्गत शिबिर घेण्यात आले.

या शिबिरास अहिल्यानगर जिल्ह्यातून थेलेसेमीया रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच सामाजिक कार्यकर्ते व तरुण-तरुणी उपस्थित होते. यावेळी जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी, आदित्य चांदेकर, संचालिका रुपाली म्हसे, डॉ. अंजली केवळ, डॉ. अमेय कांबळे, जिल्हा रुग्णालय थॅलेसेमिया डे केअर सेंटरच्या डॉ. रुपाली कुलकर्णी, डॉ. गुलशन गुप्ता, डॉ. गौरी जोशी, प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी स्मिता बडवे, थॅलेसेमिया जिल्हा समन्वयक गौरव पठाडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास मढीकर, सोनाली खांडरे, शरद बळे, शंकर खंडागळे, विनिता धामणगावकर, किरण शिंदे, गौरव बागल आदी उपस्थित होते.

थॅलेसेमिया हा अनुवंशिक रक्ताचा आजार आहे. आई-वडिलांकडून मुलांमध्ये होऊ शकतो. आयुष्यभर रक्त वाढवावे लागू शकते. योग्य काळजी घेतल्यास हा आजार टाळता येऊ शकतो. लग्नापूर्वी प्रत्येक जोडप्याने थॅलेसेमिया वाहक (मायनर) ची रक्त तपासणी करणे अनिवार्य आहे. दोन थॅलेसेमिया (मायनर) वाहकांचे लग्न टाळून होणाऱ्या मुलांमधील थॅलेसेमिया मेजरचा धोका रोखण्यास मदत होईल. जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने थॅलेसेमिया मुक्त अहिल्यानगर करण्यासाठी उचललेले हे पहिले पाऊल आहे. आरोग्यदायी व थॅलेसेमिया मुक्त पिढी घडविण्यासाठी समाजात जनजागृती होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जनकल्याण रक्त केंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री यांनी केले आहे.

डॉ.रूपाली म्हसे म्हणाल्या, थॅलेसेमिया आजारावर उपचारापेक्षा प्रतिबंध अधिक प्रभावी असून विवाहपूर्व व गर्भधारणेपूर्वी तपासणीद्वारे भविष्यातील पिढीला थॅलेसेमियापासून सुरक्षित ठेवता येऊ शकते. थॅलेसेमिया या अनुवंशिक आजाराच्या प्रतिबंधासाठी समाजात व्यापक जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हे अभियान हाती घेतले आहे.

डॉ. अंजली केवळ म्हणाल्या, थॅलेसेमिया तपासणी कोणी करावी-लग्न ठरलेल्या युवक युवती, महाविद्यालयीन विद्यार्थी, नवविवाहित जोडपी, थॅलेसेमिया रुग्णांच्या नातेवाईकांनी तसेच ज्या कुटुंबाचा इतिहास आहे. त्यांनी ही तपासणी करणे आवश्यक आहे.

आदित्य चांदेकर म्हणाले, थॅलेसेमिया प्रतिबंधक उपाय म्हणून प्रत्येक जोडप्याने विवाहपूर्व थॅलेसेमिया तपासणी करणे आवश्यक आहे. थॅलेसेमिया मुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सकारात्मक भूमिका घेणे महत्त्वाची आहे. सोनाली खांडरे यांनी उपस्थितांना थॅलेसेमिया मुक्त अहिल्यानगर करण्यासाठी प्रतिज्ञा दिली. सूत्रसंचालन डॉ. विलास मढीकर यांनी केले. आभार गौरव पठाडे यांनी मानले.

# अर्थजगत

एडेलवाइस म्युच्युअल फंडाच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राधिका गुप्ता यांनी भारतीय गुंतवणूकदारांना 'गिफ्ट सिटी' (गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक-सिटी) च्या माध्यमातून परदेशात कशी गुंतवणूक करता येईल, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले आहे.

## 'गिफ्ट सिटी'तून करा परदेशात गुंतवणूक

प्रत्येक सुज्ञ गुंतवणूकदाराच्या पोर्टफोलिओमध्ये जागतिक विविधीकरण (ग्लोबल डायव्हर्सिफिकेशन) असणे आवश्यक आहे. भारतीय बाजारपेठ सध्या उत्तम कामगिरी करत असली, तरी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), जागतिक ब्रँड्स आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये थेट गुंतवणूक करण्यासाठी परदेशी बाजारपेठेशिवाय पर्याय नाही. मात्र, भारतातील पारंपारिक म्युच्युअल फंडांच्या माध्यमातून परदेशात गुंतवणूक करण्यावर सध्या मर्यादा आल्या आहेत. रिझर्व्ह बँक आणि सेबीने देशांतर्गत फंड हाउसेससाठी ७ अब्ज अमेरिकन डॉलर्सची आणि परदेशी ईटीएफसाठी १ अब्ज डॉलर्सची जी उद्योगव्यापी मर्यादा (इंडस्ट्री-वाईड कॅप) ठरवून दिली आहे, ती बहुतांश फंड हाउसेसनी पूर्णपणे वापरली आहे. यामुळे अनेक मोठ्या फंडांना त्यांच्या आंतरराष्ट्रीय योजनांमध्ये नवीन एकरकमी गुंतवणूक (लम्पसम) किंवा नवीन सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) स्वीकारणे पूर्णपणे बंद करावे लागले आहे. अशा कोंडीच्या काळात, गिफ्ट सिटी हा भारतीय गुंतवणूकदारांसाठी एक कायदेशीर आणि विना-अडथळा मार्ग म्हणून उदयास आला आहे.



जागतिक पातळीवर पोर्टफोलिओचे विविधीकरण (डायव्हर्सिफिकेशन) करण्यासाठी आणि भारतीय बाजाराबाहेरील क्षेत्रांचा लाभ घेण्यासाठी हा एक अत्यंत प्रभावी आणि कायदेशीर मार्ग ठरत आहे.

गिफ्ट सिटी हे विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) असल्याने त्याला आंतरराष्ट्रीय वित्तीय क्षेत्राचा (ऑफशोर ज्युरिस्डिक्शन) दर्जा प्राप्त आहे, ज्यामुळे तिथे जागतिक गुंतवणुकीचे नियम अधिक शिथिल आणि सुटसुटीत आहेत.

निवासी भारतीय नागरिक रिझर्व्ह

### ■ गुंतवणूक

बँकेच्या लिबरलाईज्ड रेमिटन्स स्कीम म्हणजेच एलआरएस (एलआरएस) अंतर्गत दरवर्षी २,५०,००० अमेरिकन डॉलर्सपर्यंतची रक्कम गिफ्ट सिटीमधील फंडांमध्ये गुंतवू शकतात. या अंतर्गत गुंतवणूकदार तिथल्या फीडर फंडांच्या माध्यमातून थेट अमेरिका, युरोप किंवा आशियाई बाजारपेठांमधील (उदा. एडेलवाइसचा ग्रेटर चायना इक्विटी फंड जो जेपी मॉर्गनच्या मास्टर फंडात गुंतवतो) नामांकित कंपन्यांमध्ये गुंतवणूक करू शकतात. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि कायदेशीर चौकटीत होते.

गुंतवणुकीच्या रचनेबाबत सांगायचे तर, हे फंड प्रामुख्याने डॉलर्समध्ये व्यवहार करतात. भारतीय गुंतवणूकदार आपले रुपये बँकेमार्फत डॉलर्समध्ये रूपांतरित करून गिफ्ट सिटीमध्ये पाठवतात आणि तिथून पुढे ती रक्कम जागतिक बाजारपेठेत गुंतवली जाते. अनिवासी भारतीयांसाठी (एनआरआय) देखील ही व्यवस्था अत्यंत सोयीची आहे, कारण ते आपल्या परकीय चलनातील बचत थेट कोणत्याही गुंतागुंतीशिवाय या आंतरराष्ट्रीय फ्रेमवर्कमध्ये गुंतवू शकतात.

अर्थात, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक करताना चलनातील चढ-उतार (करन्सी रिस्क) लक्षात घेणे गरजेचे आहे, कारण डॉलर आणि रुपयाच्या मूल्यांमधील बदलाचा थेट परिणाम परताव्यावर होतो. याशिवाय, जागतिक स्तरावरील भू-राजकीय घडामोडी आणि संबंधित देशांमधील बाजाराची स्थिती यावर या फंडांची कामगिरी अवलंबून असते, त्यामुळे गुंतवणूकदारांनी किमान ५ वर्षांचा दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवूनच यामध्ये पाऊल टाकावे.

■ करचना




## ईटीएफमध्ये भांडवली नफा मिळवताय?

**इक्विटी ईटीएफमध्ये प्रामुख्याने इक्विटी शेअर्समध्ये गुंतवणूक केली जाते. या फंडांमध्ये जर ६५ टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक इक्विटीमध्ये असेल, तर त्यांना इक्विटी ओरिएंटेड ईटीएफ मानले जाते. या प्रकारच्या ईटीएफची विक्री केल्यानंतर मिळणाऱ्या नफ्यावर भांडवली नफा कर लागू होतो. जर युनिट १२ महिन्यांच्या आत विकले गेले, तर त्यावर २० टक्के दराने अल्पमुदतीचा भांडवली नफा कर (एसटीसीजी) द्यावा लागतो. याउलट, १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीनंतर युनिट विकल्यास, १२.५ टक्के दराने दीर्घमुदतीचा भांडवली नफा कर (एलटीसीजी) आकारला जातो. मात्र, एका आर्थिक वर्षात १.२५ लाख रुपयांपर्यंतचा एकूण दीर्घमुदतीचा नफा करमुक्त असतो.**

नॉन-इक्विटी ईटीएफमध्ये प्रामुख्याने डेट फंड, सोने किंवा आंतरराष्ट्रीय शेअर्समध्ये गुंतवणूक करणारे फंड येतात. १ एप्रिल २०२३ नंतर खरेदी केलेल्या डेट ईटीएफच्या बाबतीत, कालावधी काहीही असो, त्यावरील नफा हा गुंतवणूकदाराच्या वैयक्तिक कर रचनेनुसार करपात्र असतो. या नफ्यावर कोणत्याही प्रकारच्या इंडेक्सेशनचा लाभ मिळत नाही. म्हणजेच, हे उत्पन्न थेट अन्य स्रोतांतून मिळालेल्या उत्पन्नासारखे मानले जाऊन त्यावर लागू असलेल्या टॅक्स स्लॅबनुसार कर भरणा करावा लागतो.

आंतरराष्ट्रीय ईटीएफ किंवा सोने-चांदीच्या ईटीएफसाठी कर आकारणीचे नियम डेट ईटीएफपेक्षा काहीसे वेगळे आहेत. या साधनांमध्ये १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी गुंतवणूक ठेवल्यास त्यावर १२.५ टक्के दराने दीर्घमुदतीचा कर लागू होतो, मात्र यामध्ये इंडेक्सेशनचा फायदा मिळत नाही. ही गुंतवणूक १२ महिन्यांच्या आत विकली, तर त्यावर गुंतवणूकदाराच्या वैयक्तिक उत्पन्न कर स्लॅबनुसार कर भरावा लागतो.

ईटीएफच्या लाभांशावर (डिव्हिडंड) होणाऱ्या कर आकारणीबद्दल बोलायचे झाल्यास, गुंतवणूकदाराला मिळणारा लाभांश हा त्याच्या एकूण उत्पन्नात जोडला जातो. या उत्पन्नावर गुंतवणूकदाराच्या संबंधित टॅक्स स्लॅबनुसार कर भरावा लागतो. लाभांशाची रक्कम जर एका वर्षात विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर त्यावर टीडीएस (टीडीएस) कपात करण्याची तरतूद आहे, जी गुंतवणूकदार त्यांच्या आयटीआर भरताना टॅक्स क्रेडिट म्हणून क्लेम करू शकतात.

**आयटीआर भरताना**

गुंतवणूकदारांनी आयटीआर भरताना ईटीएफ व्यवहारांची माहिती योग्य रितीने देणे आवश्यक असते.

भांडवली नफ्याची गणना करताना ब्रोकरेज, स्टॅम्प ड्युटी आणि इतर व्यवहार खर्च नफ्यातून वजा केले जाऊ शकतात, ज्यामुळे निव्वळ करपात्र उत्पन्न कमी होते. मात्र, व्यवहार करताना भरलेला सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) वजावट म्हणून दाखवता येत नाही.

ईटीएफच्या व्यवहारातून झालेला तोटा, गुंतवणूकदार पुढील आठ वर्षांपर्यंत भांडवली नफ्यासोबत वळता (सेट ऑफ) करून आपल्या कर दायित्वात बचत करू शकतात.

## वेलकम बोनसचा भुलभुलैय्या

### ■ जाणून घ्या



क्रेडिट कार्ड कंपन्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध योजना आणत असतात. यातीलच एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय प्रकार म्हणजे वेलकम बोनस. नवीन क्रेडिट कार्ड घेतल्यावर सुरुवातीला मिळणाऱ्या या विशेष ऑफरचे जसे फायदे आहेत, तसेच काही धोकेही आहेत.

तुम्ही एखादे नवीन क्रेडिट कार्ड घेता, तेव्हा बँक किंवा वित्तीय संस्था तुम्हाला स्वागताचे प्रतीक म्हणून काही आकर्षक भेटवस्तू किंवा ऑफर्स देते. यालाच 'वेलकम बोनस' किंवा 'साइन-अप बोनस' म्हणतात. हे बोनस मिळवण्यासाठी सहसा कार्ड मिळाल्यानंतर पहिल्या ३० ते ९० दिवसांत ठरावीक रक्कम खर्च करावी लागते किंवा कार्डचे जॉइनिंग फी भरावी लागते.

**■ प्रमुख फायदे**

भेटवस्तू आणि व्हाउचर्स: अनेक बँका कार्ड सुरू होताच मोठ्या ब्रँड्सचे (उदा. ॲमेझॉन, मिंट्रा, फ्लिपकार्ट) ई-गिफ्ट व्हाउचर्स देतात.

मोठ्या प्रमाणावर रिवॉर्ड पॉईंटस्: सामान्य व्यवहारांपेक्षा वेलकम बोनसमध्ये ५,००० ते २०,००० पर्यंत अतिरिक्त रिवॉर्ड पॉईंटस् मिळतात, जे नंतर कॅशबॅक किंवा शॉपिंगसाठी वापरता येतात.

मोफत विमानाची तिकिटे आणि मेंबरशिप: प्रीमियम किंवा ट्रॅव्हल क्रेडिट कार्ड्सवर मोफत विमानाचे तिकीट किंवा ॲमेझॉन प्राईम, झोमॅटो गोल्ड यांसारख्या सेवांची वार्षिक मेंबरशिप मोफत मिळते.

कॅशबॅक ऑफर: पहिल्या काही दिवसांतील खर्चावर ५% ते १०% पर्यंत थेट कॅशबॅक मिळतो, ज्यामुळे पैशांची चांगली बचत होते.

**■ बोनसमागील धोके**

वेलकम बोनस मिळवण्यासाठी बँका पहिल्या ३० दिवसांत ५०,००० रुपये खर्च करा अशी अट घालतात. हा बोनस मिळवण्याच्या नादात अनेक जण गरजेपेक्षा जास्त खर्च करतात.

ज्या कार्डवर मोठे वेलकम बोनस मिळतात, त्यांची जॉइनिंग आणि वार्षिक फी खूप जास्त असते. अनेकदा बोनसचे मूल्य या फीपेक्षा कमीच असते.

अनेकदा हे बोनस मिळवण्याच्या अटी क्लिष्ट असतात. उदाहरणार्थ, वॉलेट लोड किंवा भाडे भरण्यासाठी केलेले व्यवहार या बोनससाठी ग्राह्य धरले जात नाहीत.

तुम्ही बोनसच्या अटी पूर्ण करण्यासाठी अतिखर्च केला आणि वेळेवर बिल भरू शकला नाही, तर बँक त्यावर ३६% ते ४५% पर्यंत वार्षिक व्याज आकारते. यामुळे बोनसचा फायदा मिळण्याऐवजी आर्थिक नुकसान होते.

थोडक्यात, काय तर केवळ वेलकम बोनस पाहून कधीही क्रेडिट कार्ड निवडू नका. त्या कार्डची नियमित फी, रिवॉर्ड रेट आणि तुमच्या गरजेनुसार त्याचा होणारा वापर तपासूनच निर्णय घ्या.

शहाणपणाने आणि शिस्तीने वापर केल्यास क्रेडिट कार्डचा वेलकम बोनस हा फायदेशीर ठरू शकतो, मात्र अविचाराने केलेला वापर आर्थिक संकटात टाकू शकतो.

## ग्राहकहितैषी निकाल

वाहन अपघात झाल्यानंतर अनेकदा विमा कंपन्या किरकोळ तांत्रिक चुका, अपघाताच्या वेळेतील विसंगती किंवा पोलीस तक्रारीचा अभाव अशी कारणे पुढे करून ग्राहकांचा हक्काचा क्लेम पूर्णपणे फेटाळून लावतात. मात्र, गुजरातच्या नवसारी जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोगाने नुकताच एक महत्त्वपूर्ण आणि ग्राहकस्नेही निकाल देत विमा कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावला आहे.

नवसारी येथील रहिवासी चिराग देसाई यांच्या कारला सुरत जवळील एका चौकात ट्रकने धडक दिली होती. यामध्ये कारचे मोठे नुकसान झाले होते. देसाई यांनी कारच्या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी विमा कंपनीकडे दावा दाखल केला. परंतु, कंपनीने नियुक्त केलेल्या तपासकाने अपघाताच्या परिस्थितीवर संशय व्यक्त केला. कारच्या डॅशबोर्डचे झालेले नुकसान आणि ट्रकच्या धडकेची स्थिती यात विसंगती असल्याचे कंपनीचे म्हणणे होते. तसेच अपघाताबाबत कोणतीही पोलीस तक्रार दाखल नसणे, घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार न मिळणे आणि चालकाने अपघातानंतर लगेच वैद्यकीय उपचार न घेणे, अशी अनेक कारणे दाखवून विमा कंपनीने ग्राहकाचा क्लेम पूर्णपणे फेटाळला होता.



विमा कंपनीच्या या भूमिकेविरुद्ध देसाई यांनी ग्राहक न्यायालयात धाव घेतली. ग्राहक न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि पुरावे अत्यंत बारकाईने तपासून पाहिले. सुनावणी दरम्यान न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. अपघाताची नेमकी वेळ किंवा समोरच्या वाहनाचा तपशील अर्जदाराला अचूकपणे देता आला नसल्याने अपघात १०० टक्के सिद्ध होत नसला, तरीही कारचे प्रत्यक्ष नुकसान झाले आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, विमा कंपनीच्या स्वतःच्या अधिकृत सर्व्हेअरने कारच्या नुकसानीचे मूल्यांकन सव्वा लाख रुपयांपेक्षा जास्त केले होते, ही बाब न्यायालयाने अधोरेखित केली.

न्यायालयाने स्पष्ट शब्दात सुनावले की, जेव्हा वाहनाचे प्रत्यक्ष नुकसान डोळ्यांसमोर दिसत आहे आणि कंपनीच्या सर्व्हेअरनेही त्याला मंजुरी दिली आहे, तेव्हा केवळ तांत्रिक विसंगतींचे कारण काढून क्लेम पूर्णपणे नाकारणे ही विमा कंपनीच्या सेवेतील ढिसाळपणा आणि त्रुटी दर्शवते. या आधारानुसार ग्राहक न्यायालयाने विमा कंपनीला आदेश दिला की, त्यांनी तक्रारदाराला नुकसानीपोटी १,२५,८९५ रुपये वार्षिक ९ टक्के व्याजासह द्यावेत. याशिवाय ग्राहकाला झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासासाठी आणि न्यायालयीन खर्चासाठी अतिरिक्त १५,००० रुपये देण्याचेही आदेश देण्यात आले. हा निकाल देशातील लाखो वाहनधारकांसाठी दिलासादायक असून, विमा कंपन्या ग्राहकांना विनाकारण त्रास देऊ शकत नाहीत हे यातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.




## जाणून घ्या जुलैमधील 'अंतिम मुदती'

जुलै महिना हा भारतातील करदात्यांसाठी कर विषयक पूर्तता (टॅक्स कॉम्प्लायन्स) करण्याच्या दृष्टीने अत्यंत गडबडीचा आणि महत्त्वाचा असतो. आर्थिक वर्ष २०२५-२६ (करनिर्धारण वर्ष २०२६-२७) साठी प्राप्तिकर परतावा (आयटीआर) भरण्यापासून ते टीडीएसच्या विविध नियमांचे पालन करण्यापर्यंतच्या ५ प्रमुख अंतिम मुदती (डेडलाइन्स) जुलै महिन्यात येत आहेत. या मुदतींचे वेळेत पालन न केल्यास करदात्यांना दंड किंवा व्याजाचा सामना करावा लागू शकतो.

जुलै महिन्यातील सर्वात मोठी आणि पहिली अंतिम मुदत ७ जुलै रोजी असते. या तारखेपर्यंत कंपन्या आणि कर वजा करण्यास पात्र असलेल्या संस्थांना मागील महिन्यात म्हणजेच जून महिन्यामध्ये कपात केलेला टीडीएस (उद्गम स्थानी कर कपात) आणि टीसीएस (उद्गम स्थानी कर संग्रह) सरकारी तिजोरीत जमा करणे बंधनकारक असते. या तारखेनंतर कर जमा केल्यास दरमहा १.५ टक्के दराने व्याज आकारले जाते.

दुसरी महत्त्वाची मुदत ही १५ जुलै रोजी संपते. जून अखेर संपलेल्या तिमाहीसाठी नियोक्ता किंवा कंपन्यांनी कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या केलेल्या कर कपातीचे टीडीएस प्रमाणपत्र (उदा. फॉर्म १६ए) जारी करण्याची ही अंतिम तारीख असते. याशिवाय, बँकेकडून मुदत ठेवींवरील व्याजाचा टीडीएस कशामुळे वजा करू नये यासाठी गुंतवणूकदारांनी सादर केलेल्या फॉर्म १५जी किंवा फॉर्म १५एच च्या घोषणापत्रांची इलेक्ट्रॉनिक प्रत प्राप्तिकर विभागाकडे अपलोड करण्यासाठी देखील १५ जुलै हीच शेवटची तारीख असते.

जुलै अखेरीस म्हणजेच ३० जुलै रोजी तिसरी मुदत येते. कर कपात करणाऱ्या संस्थांना एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीसाठीचे अधिकृत 'टीडीएस स्टेटमेंट' किंवा त्रैमासिक टीडीएस रिटर्न सादर करावे लागतात. हे रिटर्न वेळेत न भरल्यास प्राप्तिकर नियमांनुसार दररोज २०० रुपयांचा दंड लागू होऊ शकतो, जो एकूण टीडीएसच्या रकमेपेक्षा जास्त नसावा.

जुलै महिन्यातील चौथी आणि सर्वात महत्त्वाची सार्वत्रिक मुदत म्हणजे ३१ जुलै होय. ज्या करदात्यांच्या खात्यांचे ऑडिट (लेखापरीक्षण) करणे कायद्यानुसार बंधनकारक नाही, अशा सर्व वैयक्तिक पगारदार व्यक्ती, व्यावसायिक आणि किरकोळ करदात्यांसाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ चा प्राप्तिकर परतावा (आयटीआर) भरण्याची ही अंतिम तारीख असते. नियमानुसार वेळेत आयटीआर न भरल्यास कलम २३४एफ अंतर्गत ५,००० रुपयांपर्यंत उशिरा फी (लेट फी) आकारली जाऊ शकते; मात्र करपात्र उत्पन्न ५ लाख रुपयांपेक्षा कमी असल्यास हा लेट फीचा दर कमाल १,००० रुपये इतकाच मर्यादित असतो.


पाचवी महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, ज्या भारतीय नागरिकांची परदेशात बँक खाती आहेत, शेअर्स आहेत किंवा कोणतीही वित्तीय मालमत्ता आहे, त्यांनी ३१ जुलैपर्यंत भरल्या जाणाऱ्या आयटीआरमध्ये 'शेड्युल एफए' (फॉरेन असेट्स) अंतर्गत त्याची अचूक माहिती देणे बंधनकारक आहे. जरी त्यांचे एकूण उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी असले, तरीही परदेशी मालमत्ता घोषित न केल्यास काळ्या पैशा प्रतिबंधक कायद्यानुसार (ब्लॅक मनी ॲक्ट) गंभीर कायदेशीर कारवाई आणि मोठ्या दंडाला सामोरे जावे लागू शकते.

## प्रवासविमा का हवा?

आंतरराष्ट्रीय प्रवासाचे नियोजन करताना पासपोर्ट आणि व्हिसा जेवढे महत्त्वाचे असतात, तितकाच ट्रॅव्हल इन्शुरन्स म्हणजेच प्रवास विमा देखील अनिवार्य बनला आहे. अनेक देश आता 'नो इन्शुरन्स, नो एंट्री' या धोरणाचा कडक अवलंब करत आहेत. म्हणजेच, जर तुमच्याकडे वैध प्रवास विमा नसेल, तर तुम्हाला त्या देशात प्रवेश दिला जात नाही.अचानक उद्भवणारे वैद्यकीय आणीबाणीचे प्रसंग, अपघाताचा खर्च किंवा विमानाला होणारा उशीर यांमुळे पर्यटकांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी अनेक देशांनी हा नियम कायदेशीररित्या बंधनकारक केला आहे.

१. शेंगेन क्षेत्रातील देश (ड्लहशपसशप ऊॅपींॲळशी)

युरोपमधील २९ देशांचा समावेश असलेल्या 'शेंगेन क्षेत्रात' (उदा. फ्रान्स, जर्मनी, इटली, स्वित्झर्लंड, स्पेन) प्रवास करण्यासाठी ट्रॅव्हल इन्शुरन्स असणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. शेंगेन व्हिसासाठी अर्ज करतानाच विम्याचे प्रमाणपत्र जोडावे लागते. या विम्यामध्ये किमान ३०,००० युरोचे (सुमारे २७ ते २८ लाख रुपये) वैद्यकीय कवच असणे आवश्यक आहे, ज्यामध्ये आपत्कालीन वैद्यकीय उपचार आणि मायदेशी परत आणण्याचा खर्च समाविष्ट असला पाहिजे.




आशिया खंडातील अनेक लोकप्रिय पर्यटन स्थळांनीही हा नियम लागू केला आहे. उदाहरणार्थ, थायलंडमध्ये पर्यटकांसाठी प्रवास विमा असणे आवश्यक आहे, ज्यामध्ये वैद्यकीय उपचारांचा खर्च समाविष्ट असावा. याशिवाय संयुक्त अरब अमिराती म्हणजेच दुबई, अबुधाबी या ठिकाणी पर्यटनासाठी जाताना आरोग्य विमा असणे सक्तीचे आहे. कतार सारख्या देशांनीही त्यांच्या देशात येणाऱ्या सर्व परदेशी नागरिकांसाठी स्थानिक नोंदणीकृत कंपन्यांचा किंवा मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा विमा अनिवार्य केला आहे.

क्युबा, इक्वेडोर आणि गॅलापागोस बेट यांसारख्या देशांमध्ये प्रवेश करण्यासाठी वैद्यकीय प्रवास विमा असणे बंधनकारक आहे. जरी अमेरिका आणि कॅनडा या देशांनी सामान्य पर्यटकांसाठी विमा सक्तीचा केला नसला, तरी तेथील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी आणि काही विशेष व्हिसा धारकांसाठी आरोग्य विमा असणे अत्यंत आवश्यक आहे. शिवाय, अमेरिकेतील वैद्यकीय उपचारांचा प्रचंड खर्च पाहता, तिथे विम्याशिवाय प्रवास करणे अत्यंत जोखमीचे मानले जाते.

**मुख्य फायदे**

प्रवास विम्यामध्ये केवळ वैद्यकीय उपचारांचाच खर्च मिळत नाही, तर प्रवासादरम्यान उद्भवणाऱ्या इतर अनेक समस्यांवरही आर्थिक संरक्षण मिळते. यामध्ये परदेशात सामान गहाळ होणे, महत्त्वाचे दस्तऐवज किंवा पासपोर्ट हरवणे, विमानाचे उड्डाण रद्द होणे किंवा विमानाला प्रचंड उशीर होणे यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीची भरपाई कंपनीकडून दिली जाते. परदेशातील अनपेक्षित खर्च टाळण्यासाठी आणि सुरक्षित प्रवासासाठी ट्रॅव्हल इन्शुरन्स हे एक आवश्यक साधन बनले आहे.

## सोने-चांदीतील घसरण : गुंतवणूक करावी का?

गेल्या काही दिवसांत जागतिक आणि देशांतर्गत वित्तीय बाजारात अत्यंत नाट्यमय घडामोडी पाहायला मिळत आहेत. विशेषतः मौल्यवान धातूंच्या किमतींमध्ये झालेली मोठी घसरण हा सध्या गुंतवणूकदारांमध्ये अत्यंत चर्चेचा आणि चिंतेचा विषय बनला आहे. सलग अनेक महिने नवनवे उच्चांक प्रस्थापित केल्यानंतर, आता सोन्या-चांदीच्या दरांनी एका पाठोपाठ एक नीचांकी पातळ्या गाठण्यास सुरुवात केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींचा हा थेट परिणाम भारतीय बाजारपेठेवर म्हणजेच 'एमसीएक्स' वर स्पष्टपणे दिसून येत आहे.

या मोठ्या घसरणीमागे अमेरिकेतील केंद्रीय बँक म्हणजेच 'फेडरल रिझर्व्ह'चे कडक आर्थिक धोरण हे सर्वात महत्त्वाचे कारण मानले जात आहे. अमेरिकेतील महागाईचा दर अपेक्षेपेक्षा जास्त राहिल्यामुळे व्याजदरांमध्ये आणखी वाढ होण्याचे संकेत मिळत आहेत. जेव्हा व्याजदर वाढतात, तेव्हा गुंतवणूकदार सोन्यासारख्या थेट परतावा न देणाऱ्या पर्यायांकडून आपला पैसा काढून सरकारी रोख्यांमध्ये गुंतवण्यास प्राधान्य देतात. याशिवाय, अमेरिकन डॉलरचा निर्देशांक मजबूत झाल्यामुळे जागतिक स्तरावर सोन्या-चांदीची मागणी घटली आहे. या पार्श्वभूमीवर, गुंतवणूकदारांसमोर आता एक नवीन पेच निर्माण झाला आहे, तो म्हणजे 'सोन्यात गुंतवणूक करावी की चांदीमध्ये?' वित्तीय तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या स्थितीत दोन्ही धातूंचे वेगळे वैशिष्ट्य आणि जोखीम आहे. चांदीचा विचार केला तर तिच्यामध्ये चढ-उतार म्हणजेच अस्थिरता खूप जास्त असते. चांदी केवळ एक मौल्यवान धातू नसून, तिचा वापर इलेक्ट्रॉनिक्स, सौर ऊर्जा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या औद्योगिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे जागतिक पातळीवर औद्योगिक मंदीचे सावट आल्यास चांदीच्या किमतींवर वेगाने नकारात्मक परिणाम होतो.



तांत्रिक विश्लेषण पाहिल्यास, गोल्ड-सिल्व्हर रेशो' ७० च्या पार गेल्यामुळे सोन्याच्या तुलनेत चांदी सध्या अधिक कमकुवत होताना दिसत आहे. देशांतर्गत बाजारात चांदी दोन लाख रुपयांच्या पातळीपर्यंत खाली येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुसऱ्या बाजूला, सोन्याला नेहमीच 'सेफ हेवन असेट' मानले जाते. आर्थिक अनिश्चितता किंवा महागाई वाढते, तेव्हा सोने हे भांडवलाचे रक्षण करण्यासाठी सर्वोत्तम 'वेल्थ इन्शुरन्स' ठरते. सोन्याची घसरण ही चांदीच्या तुलनेत संथ आणि नियंत्रित असते. सोन्याचे एक्स्चेंज ट्रेडेड फंड्समध्येही सध्या किमती कमी झाल्यामुळे गुंतवणूकदारांना खरेदीची नवीन संधी उपलब्ध झाली आहे. बाजारातील या घसरणीमुळे घाबरून न जाता, याकडे एक 'हेल्दी करेक्शन' म्हणून पाहिले पाहिजे. चांदीमध्ये सध्या मोठी अस्थिरता असल्याने लगेचच मोठी रक्कम गुंतवण्याची घाई करू नये. बाजार अधिक स्थिर होण्याची वाट पाहावी. दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार करणाऱ्यांनी एकाच वेळी सर्व पैसे न लावता, टप्प्याटप्प्याने किंवा 'एसआयपी' च्या माध्यमातून मौल्यवान धातूंमध्ये गुंतवणूक करावी. यामुळे खरेदीच्या किमतीची सरासरी उत्तम प्रकारे होते आणि भविष्यात बाजारात सुधारणा झाल्यावर चांगला परतावा मिळण्याची शक्यता वाढते.

# धर्मवीर प्रतिष्ठानची सलग ३०० वी स्वच्छता मोहीम; बेलेश्वर मंदिर परिसरातून ५ ते ६ टन कचरा हटवला



नालेगाव येथील धर्मवीर युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने भिंगार येथील बेलेश्वर मंदिर परिसरात सलग ३०० व्या स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. (छाया – लहू दळवी)

नगर – नालेगाव येथील धर्मवीर युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने गेल्या सहा वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या स्वच्छता अभियानाने रविवारी ऐतिहासिक ३०० वा टप्पा पूर्ण केला. भिंगार येथील पवित्र बेलेश्वर मंदिर परिसरात सलग ३०० व्या रविवारी राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेत सुमारे पाच ते सहा टन कचरा, प्लास्टिक, झुडपे आणि गवत हटवून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी धर्मवीर युवा प्रतिष्ठानच्या कार्याचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, मागील सहा वर्षांपासून सलग ३०० रविवारी शहरातील विविध भागांत स्वच्छता अभियान राबवून प्रतिष्ठानने नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला आहे. सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, शाळा, क्रीडांगणे, स्मशानभूमी तसेच महापुरुषांच्या पुतळ्यांच्या परिसराची स्वच्छता करून त्यांनी समाजात स्वच्छतेची प्रभावी जनजागृती केली आहे. आज सोशल मीडियावर प्रतिक्रिया देणारे अनेक जण दिसतात; मात्र प्रत्यक्ष कृती करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतके असतात. अनेक अडचणींवर मात करत सलग ३०० आठवडे एकही रविवार न चुकवता स्वच्छता करणे ही प्रेरणादायी बाब आहे. नागरिकांनीही आपल्या घरापासून आणि परिसरापासून स्वच्छतेची सुरुवात करून शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. धर्मवीर युवा प्रतिष्ठान आणि अजय चितळे यांच्या टीमचे कार्य समाजाला दिशा देणारे व अनुकरणीय आहे.

या विशेष मोहिमेत आयुक्त यशवंत डांगे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय चितळे, नगरसेवक निखिल वारे, अ‍ॅड. युवराज शिंदे, सतीश शिंदे, गोरख पडोळे, संजय ढोणे, उदय अनभुले, अमोल राजेभोसले, भगवान काटे, संजय सपकाळ यांच्यासह कल्याण रोड स्वच्छता मोहीम ग्रुप, अहिल्यानगर ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटना, हर दिन मॉर्निंग ग्रुप, भिंगार परिसरातील नागरिक तसेच धर्मवीर युवा प्रतिष्ठानचे सदस्य सहभागी झाले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय चितळे म्हणाले, गेल्या सहा वर्षांपासून प्रत्येक रविवारी सकाळी ८ ते १० या वेळेत शहरातील विविध भागांत स्वच्छता अभियान राबविले जाते. ओपन स्पेस, पुरातन मंदिरे, शाळा, क्रीडांगणे, स्मशानभूमी तसेच महापुरुषांच्या पुतळ्यांच्या परिसराची नियमित स्वच्छता केली जाते. आज या अभियानाने सलग ३०० आठवड्यांचा टप्पा गाठला असून एकाही रविवारी मोहिमेत खंड पडलेला नाही. या अभियानाला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, महापालिका आयुक्त यशवंत डांगे तसेच विविध नगरसेवकांचे सातत्याने सहकार्य लाभत आहे. बेलेश्वर मंदिराच्या प्रवेशद्वारासमोरील मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा हटवून परिसर स्वच्छ करण्यात आला. या मोहिमेत युवकांचा वाढता सहभाग शहरात स्वच्छतेचा प्रभावी संदेश देत असून संत गाडगेबाबा यांनी दिलेल्या स्वच्छतेच्या संदेशाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेवक निखिल वारे म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या स्वच्छतेच्या संदेशाला धर्मवीर युवा प्रतिष्ठानने प्रत्यक्ष कृतीची जोड दिली आहे. सलग ३०० आठवडे सुरू असलेले हे अभियान निश्चितच प्रेरणादायी असून इतर सामाजिक संस्थांनीही या उपक्रमाचे अनुकरण करावे.

प्रा. भगवान काटे यांनीही प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करत, अहिल्यानगर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रतिष्ठानने घेतलेला पुढाकार समाजासाठी प्रेरणादायी आहे. प्रतिष्ठानचे सर्व सदस्य खऱ्या अर्थाने स्वच्छतावीर असून आपले नगर – स्वच्छ नगर हा मंत्र जपत नागरिकांच्या आरोग्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत, असे सांगितले.

# नगरमध्ये शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

### गरजू रुग्णांसाठी सुरु केले वैद्यकीय मदतीचे नवे केंद्र


शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी राम रेपाळे यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – गोरगरीब व गरजू रुग्णांना तातडीने आणि प्रभावी वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्या वतीने अहिल्यानगर येथे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. हे कार्यालय गरजू रुग्णांसाठी वैद्यकीय मदतीचे नवे केंद्र ठरणार असल्याची प्रतिक्रिया शिवसेना सचिव राम रेपाळे यांनी व्यक्त केली.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश लोंढे यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या या कार्यालयाचे उद्घाटन ४ जुलै शिवसेना सचिव राम रेपाळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे उपस्थितांशी संवाद साधत या उपक्रमाला शुभेच्छा देत रुग्णसेवेच्या कार्याचे कौतुक केले.राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जाळे विस्तारत असून, त्याचाच एक भाग म्हणून अहिल्यानगर येथे हे संपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरजू नागरिकांना वैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक मार्गदर्शन, शासकीय योजनांचा लाभ, विविध रुग्णालयांशी समन्वय तसेच आरोग्यविषयक अडचणींचे तातडीने निराकरण करण्यात येणार आहे.

व्हिडिओ संवादादरम्यान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून सुरू असलेले रुग्णसेवेचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. मंगेश चिवटे आणि त्यांची संपूर्ण टीम रुग्णांच्या मदतीसाठी दिवस–रात्र कार्यरत आहे. या संपर्क कार्यालयामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून आरोग्यसेवा अधिक सुलभ व गतिमान होईल.

या कार्यक्रमास शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, शिवसेनेचे नेते दिलीप सातपुते, नगरसेवक दत्ता कावरे, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शिवसेना युवा नेते विक्रम राठोड, युवा नेते ओंकार सातपुते, मधुकर चिपाडे, अ‍ॅड. हर्षल काकडे, राजेंद्र पोकळे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे रणजीत परदेशी, अहिल्यानगर दक्षिण वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख रोहित लोखंडे, अनिल लंके, स्वप्नील सोमवंशी, कृष्णा नरूटे, रोहन कचरे, ओम लोंढे, सविता बेल्हेकर आदी उपस्थित होते.

# स्वामी जीवनमुक्त महाराजांच्या ४७ व्या वार्षिक उत्सवानिमित्त ७ व ८ जुलै रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



नगर – सद्गुरु स्वामी जीवनमुक्त महाराज यांच्या ४७ व्या वार्षिक उत्सवानिमित्त ७ व ८ जुलैदरम्यान माळीवाडा येथील स्वामी टेऊंराम मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास जयपूर येथील अमरापूर दरबारचे संत लक्ष्मण प्रेमप्रकाशी व संत मंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती स्वामी टेऊंराम मंदिर ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी, ७ जुलै रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत हवन होणार असून सकाळी १०.३० वाजता ध्वजारोहण व सत्संगाचा कार्यक्रम स्वामी टेऊंराम मंदिरात होणार आहे. तसेच सायंकाळी ६ ते ८ या वेळेत प्रेम प्रकाश मंदिर, कृपाल आश्रमच्या मागे, मिस्कीननगर, सावेडी येथे संत मंडळींच्या उपस्थितीत सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. ८ जुलै रोजी सकाळी ८ वाजता मूर्तीपूजन, सकाळी ९ ते ११ या वेळेत संत मंडळींचा सत्संग होईल. सायंकाळी ५.३० ते ८ या वेळेत सत्संगाचा कार्यक्रम पार पडणार असून रात्री ८ ते ८.३० या वेळेत श्री प्रेम प्रकाश ग्रंथ भोग साहिब व महाप्रसादाने उत्सवाची सांगता होणार आहे. जयपूर येथील अमरापूर दरबारचे संत लक्ष्मण प्रेमप्रकाशी व संत मंडळी यांच्या सान्निध्यात हा दोन दिवसीय धार्मिक सोहळा उत्साहात पार पडणार असून, जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी टेऊंराम मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# के. जी. कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया सुरू

नगर – श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित, महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स (रात्र) महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे विश्वस्त किशोर मुनोत आणि कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी केले आहे.

महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम., बी.कॉम. (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) तसेच बीबीए (बिझनेस मॅनेजमेंट) या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. बी. कॉम. अभ्यासक्रमात बँकिंग अँड फायनान्स, कॉस्ट अँड वर्क अकाउंटिंग, मार्केटिंग आणि बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन हे विशेष विषय उपलब्ध आहेत. याशिवाय महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त एमबीए स्टडी सेंटर कार्यरत असून, नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पत्रकारिता, उद्योजकता विकास, टॅली, ऑफिस ॲडमिनिस्ट्रेशन व ऑफिस ऑटोमेशन, ट्रॅव्हल अँड टुरिझम, सॉफ्ट स्किल्स, पायथॉन, फ्रंट लाईन कम्युनिकेशन आणि रिसेप्शनिस्ट यांसारखे विविध कौशल्यवर्धक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संगणक साक्षरतेवर आधारित मोफत अभ्यासक्रमही राबविले जात आहेत.

महाविद्यालयात आधुनिक संगणक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालय, अनुभवी प्राध्यापकवर्ग, करिअर मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राशी संवाद तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम नियमितपणे आयोजित केले जातात. दिवसभर नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणांमुळे नियमित शिक्षण घेणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी रात्र महाविद्यालय हा उच्च शिक्षणाचा प्रभावी पर्याय ठरत आहे.

किशोर मुनोत म्हणाले, उच्च शिक्षण समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे, हा संस्थेचा मूलभूत उद्देश आहे. शिक्षणात खंड पडलेल्या किंवा नोकरी–व्यवसाय सांभाळत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय उपयुक्त ठरत आहे. आधुनिक शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर आमचा भर आहे.

प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत रोजगाराभिमुख कौशल्ये मिळावीत, यासाठी विविध नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. पदवी अभ्यासक्रमांसह यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एमबीए केंद्रामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. बारावी उत्तीर्ण तसेच शिक्षणात खंड पडलेल्या युवक–युवतींनी प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयाशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.


जावक क्रमाक/२२२३/२०२६ सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
२ रा मजला, मध्यवर्ती प्रशारकीय इमारत, आकाशवाणी समोर, सावेडी, अहिल्यानगर – ४१४००३.

## चौकशीची जाहीर नोटीस

कलम २२ अन्वये बदल अर्ज क्र. १३३७/२०२५
न्यासाचे नाव :–अहमदनगर इलेक्ट्रिकल मर्चंट्स असोसिएशन., घुमरे गल्ली, ता.जि. अहिल्यानगर.न्यास नोंदणी क्र. एफ–२११८० (अ.नगर)
अर्जदार :– श्री. दिनेश रामनाथ कंत्रोड
विरुद्ध
गैरअर्जदार :– कोणीही नाही
सर्व संबधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर येथील धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर विभाग,अहिल्यानगर हे नमुद केलेल्या अर्जदारांनी या कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये दाखल केलेल्या विश्वस्त बदलाच्या बदल अर्जानुसार १. परेशकुमार हसमुखलाल शहा, रा. आनंद पार्क, सारसनगर, जुनी वसंत टॉकोज, मार्केटयार्ड, अहमदनगर आपणास सन– २020 ते २०२२ या कालावधीच्या कार्यकारी मंडळातून कमी करण्यात आलेले आहे. तरी यांना या आधी नोटीस समन्स काढण्यात आलेली आहे. परंतु सदरची नोटीस न बजावता परत आलेली आहे. त्यामुळे न्यायालयामार्फत वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रकटनाबाबत आदेश झालेला आहे.

सबब तुम्हास व तमाम लोकास या जाहोर समन्सद्वारे कळविण्यात येते कि सदरच्या विश्वस्त बदल अर्जाच्या प्रकरणामध्ये आपले नाव कमो केल्यावावत काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी तारीख २२/०७/२०२६ रोजी सकाळी ११.00 वाजता या कार्यालयामध्ये समक्ष हजर राहून द्यावी, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगवयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी कलो जाईल व वदल अर्जांचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त. अहिल्यानगर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक. ०३/०७/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक (न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

**(वरिष्ठ लिपीक)**



जिल्हा मल्लखांब संघटनेच्या नुतन कार्यकारणीचे पदाधिकारी.

# जिल्हा मल्लखांब संघटनेच्या नुतन कार्यकारणीची बिनविरोध निवड

नगर–नगर जिल्हा मल्लखांब संघटनेच्या विशेष सभेत नवीन कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी नंदेश शिंदे व सचिवपदी निलेश कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.

संघटनेची यापूर्वीच्या कार्यकारणीची निवडही बिनविरोध झाली होती. यंदाही ती परंपरा कायम राहिली. मागील कार्यकारणीची मुदत संपल्याने नवीन कार्यकारणी पुढील चार वर्षांसाठी निवडण्यात आली. निवडणूक निर्णयाधिकारी म्हणून वकील स्नेहा लोखंडे यांनी काम पाहिले.

नूतन कार्यकारणी पुढीलप्रमाणे अध्यक्ष– नंदेश शिंदे, उपाध्यक्ष– अनंत रीसे व दिलीप झोळेकर, सचिव– नीलेश कुलकर्णी, सहसचिव– मोहनीराज लहाडे व सुनील सुसरे, खजिनदार– अमित जिनसीवाले. याशिवाय तांत्रिक समितीच्या निमंत्रक पदी गणेश वाळूंजकर, सदस्यपदी योगेश म्यॅकल, अमोल निमोणकर, ओंकार केसेकर व प्राजक्ता दळवी यांची नियुक्ती करण्यात आली.

मावळते अध्यक्ष राजकुमार धोत्रे यांनी नूतन कार्यकारणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संघटनेचे ज्येष्ठ सदस्य राजेश भालसिंग, समीर पठाण यांनी संघटनेच्या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. अनंत दिसे यांनी आभार मानले. निवड सभेस संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

# कवयित्री सरोज आल्हाट यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान



महाराष्ट्र भूषण पुरस्कार स्वीकारताना सरोज आल्हाट.

नगर – येथील कवयित्री व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास आमदार संग्राम भैय्या जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी संस्थेचे महाराष्ट्र राज्य सरसेनापती माधव गडदे, यशवंत सेना शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, जिल्हाध्यक्ष विजय तमनर, सरचिटणीस अजय जाडकर आदी उपस्थित होते. सरोज आल्हाट या साहित्यिक व कवयित्री म्हणून ओळखल्या जात आहेत. महिलांचे प्रश्न, शिक्षण तसेच समाजप्रबोधन या विषयांवर त्यांनी प्रभावी कार्य केले असून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा उल्लेखनीय सहभाग राहिला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. आल्हाट यांना यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे सावेडी हददीतील सर्व्हे नं. २६७ (जुना सर्व्हे नं. २२१) पैकी खालील परिशिष्टात नमूद प्लॉट मिळकती या आमचे अशिल मंदा अशोक कर्डिले यांचे एकत्र हिंदू कुटुंबाचे मालकी वहिवाटीच्या असून सदर प्लॉट मिळकतीमधील आमचे अशिलांचे हिश्श्याचे वाटप होऊन मिळणेसाठी आमचे अशिल यांनी अहमदनगर येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर यांचे कोर्टात स्पे.मु.नं २२८/२०२४ चा दावा दाखल केला असून सदर दावा प्रलंबित असताना सदर प्लॉट मिळकतीचे सातबारा उताऱ्यावर पोकळीस्त नाव असल्याचा गैरफायदा घेऊन उद्धव मेघराज तलरेजा, प्रकाश मनोहरलाल तलरेजा, परमानंद आनंदलाल तलरेजा, चिन्नीलाल अमरलाल तलरेजा, अनिल भाऊसाहेब मुरकुटे, राजश्री अनिल मुरकुटे, राजु भाऊसाहेब मुरकुटे, उज्वला राजु मुरकुटे, सुमेश बन्सीलाल जग्गी, योगेश बन्सीलाल जग्गी, अमित गुमानीशहा थापर, विश्रामसिंग बिहारीसिंग ठाकुर, लेखपालसिंग विश्रामसिंग ठाकुर, लक्ष्मी लेखपालसिंग ठाकुर, धनपतीदेवी विश्रामसिंग ठाकुर, इंद्रापालसिंग रघुबीरसिंग माकर, अशोक चंद्रभान काळे हे सदर प्लॉट मिळकतीची विक्री करण्याचे विचारात व प्रयत्नात असून, तशा त्यांच्या जोरदार हालचाली चालू असल्याचे आमचे अशिल यांना खात्रीलायक रित्या समजले आहे. त्यामुळे वरील मिळकती बाबत सदर इसमांशी कोणीही कोणतेही प्रकारे खरेदी विक्री अथवा अन्य प्रकारे हस्तांतराचे व्यवहार करु नयेत, केल्यास खरेदी घेणारे इसमास कोणतेही मालकी हक्क, कब्जा व अधिकार प्राप्त होणार नाहीत योची नोंद घेण्यांत यावी, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**परिशिष्ट**

जिल्हा अहिल्यानगर सब जिल्हा तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. २६७ (जुना सर्व्हे नं. २२१) पैकी खालील प्रमाणे बिनशेती प्लॉट मिळकती

| अ. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चौ.मी. | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १ | ५ | ६००.०० | रस्ता | प्लॉ. नं. ६ | प्लॉ. नं. २० | रस्ता |
| २ | ६ | ६००.०० | रस्ता | प्लॉ. नं. ७ | प्लॉ. नं. १९ | प्लॉ. नं. ५ |
| ३ | ७ | ६००.०० | रस्ता | प्लॉ. नं. ८ | प्लॉ. नं. १८ | प्लॉ. नं. ६ |
| ४ | ८ | ६००.०० | रस्ता | प्लॉ. नं. ९ | प्लॉ. नं. १७ | प्लॉ. नं. ७ |
| ५ | ९ | ६००.०० | रस्ता | प्लॉ. नं. १० | प्लॉ. नं. १६ | प्लॉ. नं. ८ |
| ६ | १० | ६००.०० | रस्ता | प्लॉ. नं. ११ | प्लॉ. नं. १५ | प्लॉ. नं. ९ |
| ७ | १५ | ३००.०० | प्लॉ. नं.१० | प्लॉ. नं. १४ | रस्ता | प्लॉ. नं. १६ |
| ८ | १६ | ३००.०० | प्लॉ. नं. ९ | प्लॉ. नं. १५ | रस्ता | प्लॉ. नं. १७ |
| ९ | १७ | ३००.०० | प्लॉ. नं.८ | प्लॉ. नं. १६ | रस्ता | प्लॉ. नं. १८ |
| १० | १८ | ३००.०० | प्लॉ. नं.७ | प्लॉ. नं. १७ | रस्ता | प्लॉ. नं. १९ |
| ११ | १९ | ३००.०० | प्लॉ. नं.६ | प्लॉ. नं. १८ | रस्ता | प्लॉ. नं. २० |
| १२ | २० | ३००.०० | प्लॉ. नं.५ | प्लॉ. नं. १९ | रस्ता | रस्ता |
| १३ | ३० | ३२९.०० | रस्ता | प्लॉ. नं. ३१ | स. नं. २१८ पै | प्लॉ. नं. २९ |
| १४ | ३१ | ३७४.५० | रस्ता | रस्ता | स. नं. २१८ पै | प्लॉ. नं. ३० |
| १५ | ३२ | ५१६.०० | रस्ता | प्लॉ. नं. ३३ | स. नं. २१८ पै | रस्ता |

**अ‍ॅड. धनंजय रावसाहेब वाघ**
(एल.एल. एम.)
पत्ता–फ्लॅट क्र.४. शिवतेज अपार्टमेंट
प्राईम व्हिजन हॉस्पीटल शेजारी, नवलेनगर,
गुलमोहर रोड, सावेडी अहिल्यानगर

**आमचे अशिल – सौ. मंदा अशोक कर्डिले**
पत्ता– रा. बुरूडगाव, ता. जि. अहमदनगर,
ता.०६/०७/२०२६


# भाग्योदय विद्यालयात शिक्षक–पालक संघाची स्थापना

नगर – भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक–पालक संघाची स्थापना करण्यात आली. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला आदर्श गावचे सरपंच डॉ. सुनील गंधे, संस्थेचे ज्येष्ठ संचालक रघुनाथ लोंढे, विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, मुख्याध्यापक बन्सी नरवडे, पालक प्रतिनिधी अरविंद मैड, भावना शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सुनील गंधे यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी सकस आहार, फळे, भाजीपाला, कडधान्ये, नियमित व्यायाम आणि क्रीडा यांचे महत्त्व विशद केले. सूर्यप्रकाशाचा योग्य उपयोग केल्यास सांधेदुखी व गुडघेदुखीसारख्या समस्या टाळता येतात. औषधांवरील अवलंबित्व कमी करून नैसर्गिक जीवनशैली स्वीकारण्याचा सल्लाही त्यांनी दिला. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास ज्ञान अधिक प्रभावीपणे आत्मसात होते. इंग्रजी ही आपली मातृभाषा नसून आपली संस्कृती, ग्रंथ आणि परंपरा मातृभाषेतच आहेत. शिकवणे हे एक शास्त्र असून शास्त्रशुद्ध पद्धतीने शिक्षण झाले तरच शिक्षण प्रक्रिया परिपूर्ण होते, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करताना शाळा हे ज्ञानमंदिर असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून शिक्षणात सातत्य ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कुसुमाग्रजांच्या पाऊस आला चिखल झाला, कशाला जाता दूर गड्यांनो इथेच पंढरपूर या कवितेचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांनाच दैवत मानून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. या उपक्रमांना पालकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक रेणुका माता विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे यांनी करून दिला. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब कोतकर, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, संतोष काकडे, शिवाजी धस, रूपाली शिंदे, सुनिता मेढे, आदिनाथ ठुबे तसेच कनिष्ठ विद्यालयातील प्रा. गोविंद कदम, गोरक्ष कांडेकर, एकनाथ होले, दत्तात्रय पांडुळे, गणेश गायकवाड, बाळासाहेब कावरे, सुधा गायकवाड, वैष्णवी जगताप आदींनी विशेष परिश्रम घेतले.


भाग्योदय विद्यालयात गरजू विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



### डॉ. कैलास व डॉ. आदित्य खडामकर यांचा 'डॉक्टर्स डे' निमित्त गौरव

गोरगरिबांना सवलतीच्या दरात दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणारे अहिल्यानगर जिल्ह्यातील त्वचारोग व गुप्तरोग तज्ज्ञ डॉ. कैलास खडामकर तसेच नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. आदित्य खडामकर यांचा राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त १ जुलै रोजी अल्फा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. यावेळी निसार मास्टर, कवी एम. पी. दिवाण आणि अन्सार भाई शेख यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.


## आनंदऋषीजी योगा सेंटर
### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

सर्व प्रथम श्री. अनिल मेहेर सर यांना प्रणाम. आणि सर्व योग साधकांना नमस्कार. आनंद योगा क्लास मध्ये येण्याआधी माझे वजन ७२ किलो होते ते आता ६६ किलो झाले आहे. पूर्वी मला घाम येत नव्हता परंतु आता मला फार घाम येतो. शरीर आता फार लवचिक झाले आहे. सकाळी लवकर उठायची सवय लागली आहे. राग येण्याचे प्रमाण फार कमी झाले आहे.



**– राजीव भळगट,** अहिल्यानगर

